नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष १७ * अंक ८३ * | * भंडारा * | गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## राजांचे दिवाण, बांधावर आले

आज आपले जवळपास सर्व मंत्रिमंडळ शेतकऱ्यांच्या बांधावर उतरले होते. पावसाच्या कोपावतारामुळे उध्वस्त झालेल्या महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसायला मंत्रिमंडळातील सर्वांनीच विविध ठिकाणी हजेरी लावली. सरकारला जनतेच्या रोषाची दखल घेणे भाग पडते. मुख्यमंत्र्यांनी आपल्या सुभेदारांना जनतेच्या निकट जाण्याचे आदेश दिलेले असावेत. नुकतेच कृषिमंत्री म्हणून दत्ता भरणे आले आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये पाणी भरणे झाले. कृषिमंत्री पदावरून पायउतार झाल्याबद्दल माणिकराव कोकाटे सध्या तरी या आपत्तीमधून आपोआपच बाहेर पडलेले आहेत. त्यांची इमानदारी, आणि त्यासोबतच असलेली त्यांची तळमळ बहुधा देवाने ऐकली असावी, म्हणून शेतकऱ्यांची महादुःखे ऐकण्याचे दुर्भाग्य त्यांच्या नशिबी आलेले नाही, ही त्यांच्या निष्पाप हृदयाची ग्वाही आहे असे आम्हाला वाटते. आजच्या घडीला आपल्या महाराष्ट्राचे कृषीमंत्री दत्ता भरणे बिचारे सर्वाधिक संकटग्रस्त आहेत. या अस्मानी आपत्तीने कितीतरी शेतकऱ्यांची कुटुंबे पार उध्वस्त केलेली आहेत. त्यांचे नुकसान किती झालेले आहे याची कल्पनाही अंगावर शहारे आणते. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी काल २२१५ कोटींची मदत जाहीर केली. ही मदत दिसायला मोठी असली तरी शेतकऱ्यांचे दुखणे त्यापेक्षा दहापट मोठे आहे. यापूर्वीच्या सरकारने आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी १३००० ची मदत केली होती आणि ती तीन हेक्टर पर्यंतच्या शेती क्षेत्रासाठी होती. यावेळची मदत प्रती हेक्टरी आठ हजार रुपयांची आहे आणि ती केवळ दोन हेक्टर एवढ्याच क्षेत्रासाठी आहे. शेतकऱ्यांची पिके तर बुडालीच आहेत. गहू, मका आणि इतर धान्यांचा वावरातच चिखल झाला आहे. कपाशीची बोंडे सडलेली आहेत. द्राक्षांच्या बागा उध्वस्त झालेल्या आहेत. मराठवाड्यात तर अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील मातीही वाहून गेलेली आहे. त्याची भरपाई कुठून येणार, आपत्तीग्रस्तांना मदत कुठून होणार, हा किती मोठा प्रश्न आहे त्याची सर्वांनीच कल्पना करावी. आता तर शेतीवर संकट आल्यामुळे शेतीचे उत्पादन कमी होणार आहे. कमी उत्पादन झाले की लगेच शेतमालाचे दर वाढतात. पण हे दर वाढले म्हणून आपण इतर देशातून शेतमाल आयात करतो त्यामुळे शेतकऱ्याला भाव कमीच मिळणार आहे. हल्ली शेतीचा एकरी खर्च २० ते ३० हजार रुपये आहे, यासाठी शेतकऱ्याने कर्ज काढलेले असेल तर ते कर्ज शेतकऱ्यांच्या बोकांडीवर बसलेले आहे आणि शेतीतील उत्पादन मिळण्याची अजिबातच शाश्वती नाही?. आज शेतकऱ्यांची दुःखे बघण्याकरता व त्याचा अभ्यास करण्याकरता बहुतेक मंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले म्हणजेच, ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे याचाच हा पुरावा नाही का? याच स्तंभातून आम्ही राजा उदार झाला, असे म्हटले होते. आज राजाचे दिवाण शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचलेले आहेत. यापूर्वी हिमाचल प्रदेशची एक खासदार जी पूर्वी नटी होती त्या कंगनाने त्या ठिकाणच्या संकटावर बोलताना तेथील आपत्तीग्रस्तांना मी माज्या खिशातून पैसे देऊ का, असे सुनावले होते. अशीच रुद्रवाणी महाराष्ट्रातील एका महान संकट मोचक मंत्र्याने उच्चारल्याचे आज कानावर आलेले आहे.? या सर्व महनीयांना आणि माननीयांना आमची अतिशय नम्र विनंती आहे की, त्यांनी शेतकऱ्यांशी बोलताना दिलासादायक बोलले पाहिजे. परिस्थिती नाजूक आहे देशाचा राजा आणि दिवाण आपल्याबरोबर आहेत हे निदान जनतेला दिसले तरी पाहिजे. महाराष्ट्रावरील या घोर किंबहुना घनघोर आपत्तीच्या वेळी दिलासा देणारे चार शब्द शेतकऱ्यांना आशेचे किरण वाटतील. त्यांना संकटातून उभे करतील. आपल्या सरकारने हवे तेवढे कर्ज काढून शेतकऱ्यांचा दुखण्याचा इलाज करावा, एवढीच आमची मायबाप सरकारला पाया पडून नम्र विनंती आहे. शेतकरी दुःखी असला तर आपण सर्वजण सुखी राहू शकतो काय, याचाही विचार आपल्या सर्व महनीयांनी करावा. असे आवाहन केले किंवा अपेक्षा ठेवली तर त्यात काही चुकीचे आहे असे आम्हाला वाटत नाही. शेतकऱ्यांची आणि पावसाने हतबल झालेल्या आपत्तीग्रस्तांची भूमिका सरकारने समजून घ्यावी इतकीच आमची माफक अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मुख्यमंत्र्यांकडून पूरग्रस्त भागाची पाहणी

## संकटकाळात राज्यशासन पूरग्रस्तांच्या पाठीशी; सर्वतोपरी मदत करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. २४ :

जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले शेती पिकांचे, जनावरांचे, घरांचे व व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झाले असून राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील निमगाव तसेच दारफळ सीना या गावाला भेट देऊन पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी केली, त्यांनी दोन्ही गावातील नागरिकांशी संवाद साधला. याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, माजी आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अतिवृष्टी व पूर आल्यामुळे ग्रामस्थांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या सर्वांना शासनाकडून मदत दिली जाणार आहे.



नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पूरग्रस्तांना तातडीची मदत म्हणून दोन हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यापुढेही पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत देण्यात येणार आहे. टंचाई काळात ज्या निकषाप्रमाणे मदत करण्यात येते त्याप्रमाणेच अतिवृष्टी, ओल्या दुष्काळातही मदत केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

दारफळ गावात पुरामुळे मोठे नुकसान झाले असून नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने नदीने पात्र बदलले आणि गावाचा मोठा भाग पाण्यात गेला, तसेच ग्रामस्थांच्या घरात पाणी शिरले.

त्यामुळे घरांचे, अन्नधान्याचे, शेती, जनावरांचे नुकसान झाले आहे. शेती, घरादारांकरिता, अन्नधान्य आदींसाठी शासन मदत करणार असून रस्ते, शाळा, शेतरस्ते, वीजव्यवस्था आदी सुविधांसाठीही आवश्यक ती सर्व मदत करणार आहे. व्यावसायिकांनाही नुकसानीलाही स्वतंत्र मदत करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

दौऱ्याच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माढा तालुक्यातील निमगाव येथे झालेल्या नुकसानीची पाहणी केली आणि नागरिकांच्या व्यथा जाणून घेतल्या. या संकटातून बाहेर पडण्यासाठी नागरिकांना आवश्यक मदत करण्यात येईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

### अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच मदत : अजित पवार

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व सीना नदीला आलेल्या पुरामुळे शेती, घर व पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांना शासनातर्फे लवकरच मदत दिली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. कोर्टी (ता. करमाळा), मुंगशी (ता. माढा), लांबोटी (ता. मोहोळ) या भागांतील पूरग्रस्त परिस्थितीची पाहणी उपमुख्यमंत्री पवार यांनी केली. यावेळी आमदार नारायण आबा पाटील, अपर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता धीरज साळी, सुशांत बनसोडे, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार आदी उपस्थित होते.

### लडाखमध्ये हिंसक आंदोलन, पोलिसांवर दगडफेक

# ४ ठार, ७२ जखमी

■ वृत्तसंस्था, लेह, दि. २४ :

लडाख या केंद्रशासित प्रदेशाला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा या मागणीसाठी बुधवारी लेहमध्ये हिंसक निदर्शने झाली. विद्यार्थ्यांची पोलिस आणि सुरक्षा दलांशी चकमक झाली, ज्यामध्ये चार जणांचा मृत्यू झाला आणि ७० हून अधिक जण जखमी झाले.

निदर्शनांदरम्यान विद्यार्थ्यांनी पोलिसांवर दगडफेक केली, भाजप कार्यालय आणि सीआरपीएफच्या वाहनाला आग लावली. दरम्यान, प्रशासनाने लेहमध्ये परवानगीशिवाय रॅली आणि निदर्शने करण्यास बंदी घातली आहे.

गेल्या १५ दिवसांपासून उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ हे विद्यार्थी निदर्शने करत होते. त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्याच्या निषेधार्थ निदर्शकांनी



आज बंदची हाक दिली होती. या मागण्यांबाबत पुढील बैठक ६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत होणार आहे. २०१९ मध्ये कलम ३७० आणि ३५अ रद्द करण्यात आले तेव्हा जम्मू आणि काश्मीर आणि लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश म्हणून निर्माण करण्यात आले. राज्यातील परिस्थिती सामान्य झाल्यानंतर पूर्ण राज्याचा दर्जा बहाल करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते.

### कांदिवलीत गॅस गळतीची भीषण दुर्घटना

# आगीत ७ जण होरपळले

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

कांदिवली येथील मिलिटरी मार्गावरील ईइसआयसी रुग्णालयामागच्या राम किसन मेस्त्री चाळीतील एका दुकानात बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास स्वयंपाकाच्या सिलिंडरमधून वायुगळती होऊन भीषण आग लागली. या दुर्घटनेत सातजण होरपळले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये एक पुरुष व सहा महिलांचा समावेश आहे.

राम किसन मेस्त्री चाळीतील एका दुकानात ही दुर्घटना घडली. दुकानातील एलपीजी सिलिंडरमधून गळती होत होती आणि अचानक आगीचा मोठा भडका उडाला. या दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्य सुरू केले. विद्युत यंत्रणा व विजेच्या तारांमुळे आग पसरली. या दुर्घटनेत शिवानी गांधी (५१), नीतू गुप्ता (३१), जानकी गुप्ता (३९), मनराम (५५), रेखा जोशी (४७), दुर्गा गुप्ता (३०), पुनम (२८) हे सातजण जखमी झाले. उपचारासाठी शिवानी, नीतू, जानकी, मनराम यांना तातडीने नजीकच्या ईएसआयसी रुग्णालयात, तर उर्वरित जखमींना बीडीबीए रुग्णालयात नेण्यात आले. जखमींवर प्राथमिक उपचार



केल्यानंतर त्यांना उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील ५ जिल्ह्यांना पुराचा तडाखा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :

महाराष्ट्रातील मराठवाडा भागात गेल्या चार दिवसांत झालेल्या मुसळधार पावसाने आतापर्यंत आठ जणांचा बळी घेतला आहे. लातूरमध्ये तीन, बीडमध्ये दोन आणि छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि धाराशिवमध्ये प्रत्येकी एकाचा वीज पडून, बुडून आणि इतर कारणांमुळे मृत्यू झाला आहे.

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये आलेल्या पुरात ७६६ घरांचे नुकसान झाले आहे. ३३,०१० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. बीड आणि धाराशिवमधील पाच धरणे, अनेक रस्ते,

### ८ जणांचा मृत्यू
### बंगालमध्ये १० जणांचा मृत्यू

पूल आणि शाळांचेही नुकसान झाले आहे.

दरम्यान, पश्चिम बंगालमधील कोलकाता आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये पावसामुळे मृतांचा आकडा १० वर पोहोचला आहे. यापैकी आठ मृत्यू एकट्या कोलकातामध्ये झाले आहेत. १० पैकी नऊ मृत्यू वीज पडल्याने झाले आहेत. कोलकात्यातील अनेक भाग सलग दुसऱ्या दिवशीही पाण्याखाली आहेत.

सोमवारी रात्री उशिरा ते मंगळवारी सकाळपर्यंत कोलकात्यात २५१.४ मिमी पाऊस पडला. कोलकात्यात गेल्या ३९ वर्षांमध्ये एका दिवसात झालेला हा सर्वाधिक पाऊस आहे. याआधी २६ सप्टेंबर १९८६ रोजी २५९.५ मिमी पाऊस पडला होता.

मुसळधार पावसामुळे कोलकात्यातील बहुतेक भाग २ ते ३ फूट पाण्यात बुडाले. ३० हून अधिक विमान उड्डाणे आणि अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या. शाळा आणि महाविद्यालये २५ सप्टेंबरपर्यंत बंद ठेवण्यात आली आहेत. मुसळधार पावसामुळे अनेक दुर्गा पूजा मंडळे आणि मूर्तींचेही नुकसान झाले.

### सहा माओवाद्यांनी केले आत्मसमर्पण

# ६२ लाख रुपयांचा होता इनाम



■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २४ :

राज्यातील सहा जहाल माओवाद्यांनी २४ सप्टेंबरला पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यापुढे आत्मसमर्पण केले आहे. त्यांच्यावर तब्बल ६२ लाख रुपयांचा इनाम होता. यात तीन महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. यातील दोघे विभागीय समिती सदस्य, एक कमांडर, दोन पीपीसीएम व एक एसीएस असून या सर्वांना आता शासनाकडूनच ५२ लाख रुपये देण्यात येणार आहे. यावेळी रश्मी शुकला यांच्या हस्ते या माओवाद्यांच्या हाती संविधान सोपवण्यात आले. यावेळी भिमान्ना उर्फ व्यंकटेश उर्फ सुखलाल मुतय्या कुळमेथे (वय ५८, डीव्हीसीएम, उत्तर बस्तर), त्याची पत्नी विमलक्का ऊर्फ शंकरक्का विस्तारय्या सडमेक (वय ५६, डीव्हीसीएम, माड डिव्हिजन), कविता ऊर्फ शांती मंगरू मज्जी (३४, कमांडर, वेस्ट ब्युरो टेलर टीम), नागेश ऊर्फ आयताल गुड्डी मडावी (३९, पीपीसीएम, कंपनी नं. १०), समीर आयतू पोटाम (२४, पीपीसीएम, दक्षिण ब्युरो टेक्निकल टीम) आणि नवता ऊर्फ रूपी ऊर्फ सुरेखा चैतू मडावी (२८, एसीएम, अहेरी दलम) यांचा समावेश आहे. पोलिस मुख्यालयातील एकलव्य सभागृहातील कार्यक्रमास अपर पोलिस महासंचालक (विशेष कृती) डॉ. छेरिंग दोरजे, अपर पोलिस महासंचालक , विशेष पोलिस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील, सीआरपीएफचे उपमहानिरीक्षक (अभियान) अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर अधीक्षक एम. रमेश अपर, सत्य साई कार्तिक, गोकुल राज जी., उपकमांडंट सुमित वर्मा,सहायक पोलिस अधीक्षक अनिकेत हिरडे, उपअधीक्षक विशाल नागरगोजे उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षांत गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएफच्या संयुक्त कारवायांना मोठे यश मिळाले असून, ७३ माओवादी कार्यकर्त्यांनी शस्त्रे खाली ठेवून आत्मसमर्पण केले आहे. यात केवळ २०२५ मध्येच आतापर्यंत ४० जणांनी मुख्य प्रवाहात प्रवेश केला आहे. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी या कामगिरीबद्दल पोलिस दलाचे कौतुक केले.

पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी नुकतीच गडचिरोली जिल्ह्याला भेट दिली. यावेळी त्यांनी माओवाद्यांच्या विरोधात झालेल्या यशस्वी चकमकींमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व जवानांचा गौरव केला. त्यांनी कवंडे, कोपर्शी-फुलनार आणि मोडस्के जंगल परिसरातील चकमकींमध्ये शौर्य दाखवलेल्या जवानांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी जवानांशी संवाद साधताना उर्वरित माओवादी कार्यकर्त्यांना आत्मसमर्पण करून लोकशाहीच्या प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी ३१ मार्चपूर्वी देशातून माओवाद संपवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. या संदर्भात बोलताना रश्मी शुक्ला यांनी, गृहमंत्री अमित शाह यांनी ठरवलेल्या मुदतीआधीच गडचिरोली जिल्हा माओवादमुक्त करू, असा विश्वास व्यक्त केला.

# डिसेंबरमध्येच जिल्हा परिषदेच्या निवडणुका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. आयोगाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, विधानसभेची मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी लागू राहील आणि ती जशीच्या तशी संबंधित प्रभागांमध्ये विभागली जाईल. यामुळे प्रत्येक मतदाराला आपली माहिती तपासण्याची संधी मिळेल. आयोगाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, या प्रक्रियेत हरकती व सूचना दाखल करणारे मतदार स्वतःचे नाव, पत्ता व मतदार कार्ड तपासून आवश्यक दुरुस्ती सुचवू शकतील.

सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाला स्पष्ट आदेश दिला आहे की, महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि महापालिकांच्या निवडणुका ३० जानेवारीच्या आत संपन्न केल्या पाहिजेत. कोर्टाने हेही स्पष्ट केले आहे की, आयोगाला या मुदतीसाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या आदेशानंतर राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी पहिले मोठे पाऊल उचलले आहे. आयोगाने मतदार यादीची तयारी सुरु केली असून त्यासाठी हरकती व सूचना मागवण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामुळे आगामी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि सुगमता राखण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी हरकती व सूचना मागविल्यानंतर राज्यातील महापालिका निवडणुका त्यानंतर होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे महापालिकांच्या निवडणुका जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांनंतर सुरू होतील. झेडपी व पंचायत समित्यांच्या निवडणुका नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरमध्ये होऊ शकतात, तर महापालिकांच्या निवडणुकांसाठी मतदार यादीवर हरकती व सूचना याच कालावधीत मागविली जाऊ शकतात. यामुळे सर्व स्तरांवर निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडणे शक्य होईल.

या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर केल्याने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. प्रत्येक मतदाराला आपली माहिती तपासून हरकती व सूचना दाखल करण्याची संधी मिळत असल्याने निवडणूक पारदर्शक पद्धतीने होईल, असे निवडणूक आयोगाचे अधिकाऱ्यांचे मत आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या व महापालिकांच्या निवडणुकीत वेळेवर मतदार यादी तयार होणे अत्यंत महत्त्वाचे असून, या प्रक्रियेमुळे सर्व मतदारांना मतदानाचा अधिकार सुरक्षित राहील आणि आगामी निवडणुका सुगमता आणि पारदर्शकतेने पार पाडल्या जातील.

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने आज मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला आहे. त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे. जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

### अंतिम मतदार यादी २७ ऑक्टोबरला जाहीर केली जाणार

आयोगाने याच प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना मागवल्यामुळे जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. यावर मतदारांनी १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबरला जाहीर केली जाणार आहे. यामुळे निवडणुकीसाठी आवश्यक तयारी वेळेवर पूर्ण होईल आणि कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी टाळल्या जाऊ शकतील.

### पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांच्या
## सहकाऱ्याला अटक

■ वृत्तसंस्था, श्रीनगर, दि. २४ :

पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांच्या एका साथीदाराला अटक करण्यात आल्याची घोषणा जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी बुधवारी संध्याकाळी केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीचे नाव युसूफ कटारिया आहे. २६ वर्षीय हा तरुण कुलगामचा रहिवासी आहे.

पोलिसांनी सांगितले की, आरोपी युसूफने हल्ला करणाऱ्या द रेझिस्टन्स फ्रंट (टीआरएफ) दहशतवाद्यांना लॉजिस्टिक सपोर्ट पुरवला होता. त्याला अटक करण्यात आली आणि १४ दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली. दरम्यान, मीडिया रिपोर्ट्समध्ये असे म्हटले आहे की आरोपी कटारिया हा स्थानिक मुलांना शिकवत असे. काही दिवसांपूर्वी तो दहशतवाद्यांच्या संपर्कात आला आणि त्यांना मदत करू लागला.

ऑपरेशन महादेवमध्ये जप्त केलेल्या शस्त्रास्त्रांच्या तपासादरम्यान पोलिसांना कटारियाबद्दल माहिती मिळाली. २२ एप्रिल रोजी पहलगाम हल्ल्यापूर्वीही त्याने कुलगामच्या जंगलात लष्कर-ए-तोयबाच्या दहशतवाद्यांना मदत केल्याचे उघड झाले. ऑपरेशन महादेव दरम्यान जप्त केलेल्या शस्त्रांच्या तपासातून कटारीची अटक झाली. जूनच्या सुरुवातीला, परवेझ अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर यांना अटक केली

## ओबीसी आंदोलकांवर हल्ले वाढले
### लक्ष्मण हाके यांच्या निकटवर्तीयावर हल्ला



**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण मिळाल्यानंतर राज्यात ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या आंदोलनाचे पडसाद वाढत आहेत. यातील ओबीसी आंदोलकांवर हल्ले वाढले असल्याचे दिसून आले आहे. दोन दिवसांपूर्वीच ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांच्या कारला अज्ञातांनी डिझेल टाकून पेटवून दिल्याची घटना घडली होती. ही घटना ताजी असतानाच, बीड जिल्ह्यात आणखी एक गंभीर प्रकार घडला आहे. ओबीसी आंदोलनाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांचे अतिशय विश्वासू सहकारी पवन कंवर यांच्यावर 40 ते 50 अज्ञात व्यक्तींनी प्राणघातक हल्ला केला आहे. या हल्ल्यात पवन कंवर हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या तीन साथीदारांनाही मारहाण झाली आहे. सध्या सर्व जखमींवर माजलगाव येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर ओबीसी आंदोलनाभोवती निर्माण झालेला तणाव आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पवन कंवर मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास आपल्या तीन साथीदारांसोबत सावरगावजवळील एका धाब्यावर जेवणासाठी थांबले होते. त्याचवेळी 40 ते 50 अज्ञात युवकांनी तेथे धाव घेतली आणि लाठ्या-काठ्यांनी तसेच लाथाबुक्क्यांनी चौघांवर बेछूट हल्ला चढवला. या हल्ल्यात पवन कंवर यांच्या डोक्यावर गंभीर मार लागला असून ते गंभीर जखमी झाले आहेत.

## राज्यात ओला दुष्काळ जाहीर करुन हेक्टरी ५० हजार रुपये द्या : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** राज्यात यावर्षी सरसरीपेक्षा दुप्पट, तिप्पट पाऊस पडला आहे. ३६ जिल्हे व ३५८ तालुक्यापैकी ३० जिल्हे व जवळपास ३०० तालुके अतिवृष्टी आणि पूरग्रस्त आहेत. राज्यभरात जवळपास १४३ लाख हेक्टरवरील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. पाऊस सातत्याने पडत असून शेतकरी हवालदिल झाला आहे परंतु राज्यातील महायुती सरकारला शेतकऱ्यांची चिंता नाही, पालकमंत्र्याने पाहणी सुद्धा केली नाही. मंत्रिमंडळ बैठकीत फक्त कोरडी चर्चा झाली. सरकारने झोपेतून जागे व्हावे व संकटातील शेतकऱ्याला हेक्टरी सरसकट ५० हजार रुपये तातडीने द्यावेत व शेतजमीन खरडून गेली त्यांना हेक्टरी ५ लाख रुपये द्यावेत अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

# दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी आता
## ५ लाखांहून जास्त खर्चही म. फुले व आयुष्मान योजनेतून शक्य

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंगळवारी गरीब व गरजू रुग्णांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत गरीब रुग्णांना आता पाच लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च लागणाऱ्या दुर्धर आजारांवर उपचारासाठी मदत होणार आहे. यात यकृत, अस्थिमज्जा, हृदय आणि फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी निधी उपलब्ध होणार आहे.

नव्या निर्णयानुसार, आरोग्य हमी सोसायटीला रुग्णांच्या दाव्यापोटी मिळणाऱ्या निधीपैकी २० टक्के रक्कम राखीव म्हणून ठेवण्यात येणार आहे. याच राखीव निधीचा वापर अशा महागड्या उपचारांसाठी केला जाईल.

यामध्ये हृदय प्रत्यारोपणासाठी १५ लाख, फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी २० लाख, यकृत प्रत्यारोपणासाठी २२ लाख, तर अस्थिमज्जा प्रत्यारोपणासाठी ९.५ लाख रुपयांपर्यंतचा खर्च मंजूर करण्यात आला. रुग्णालयांना मिळणाऱ्या निधीपैकी ८० टक्के रक्कम पायाभूत सुविधा, औषधे व कर्मचाऱ्यांच्या प्रोत्साहन भत्त्यांसाठी



वापरता येणार आहे.

मराठी भाषा आणि साहित्याच्या संवर्धनासाठी गेल्या १०० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक रोड शाखेला कार्यालयासाठी सवलतीच्या दरात भूखंड देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. लोकमान्य टिळक, न. चिं केळकर आणि न्या. रानडे यांनी १९०६ मध्ये स्थापन केलेल्या या संस्थेने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आणि जागतिक मराठी साहित्य संमेलनासारखे मोठे उपक्रम यशस्वीपणे पार पाडले आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेत मौजे-देवळाली येथील १०५५.२५ चौ.मी.चा भूखंड वर्ग-२ भोगवटादार स्वरूपात परिषदेला देण्यात येणार आहे. यामुळे संस्थेला स्वतःचे कार्यालय उभारता येईल.

सोलापुरातील विडी कामगार महिलांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. कॉ. मीनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कुंभारी येथील प्रकल्पातील घरांवरील नोंदणी आणि मुद्रांक शुल्कात सवलत देण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंजुरी मिळाली. या निर्णयामुळे प्रकल्पातील ८८४ घरांसाठी असलेले सुमारे ६.३० कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क आणि २.६२ कोटी रुपयांचे नोंदणी शुल्क माफ होणार आहे.

## भगरीच्या पिठातून विषबाधा
### चार महिलांवर उपचार सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, बारामती, दि. २४ :**

बारामती तालुक्यातील झारगडवाडी गावात भगरीच्या पिठातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, या घटनेत चार महिलांना त्रास झाल्याने उपचार सुरू आहेत. त्यामुळे गावात आणि परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नवरात्रोत्सवात उपवासाच्या दिवसांत महिलांकडून मोठ्या प्रमाणात भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या बनवल्या जातात. झारगडवाडीतही काही कुटुंबांनी किराणा दुकानातून आणलेल्या भगरीच्या पिठापासून भाकऱ्या केल्या. मात्र त्या खाल्ल्यानंतर काही महिलांना अचानक उलटी, मळमळ व अशक्तपणा जाणवू लागला. प्राथमिक उपचारासाठी डोलेर्वाडी येथील आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आलेल्या दोन महिलांची प्रकृती बरी असून, उर्वरित दोन महिलांवर बारामती मेडिकल कॉलेजमध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर पंचायत समितीचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज खोमणे यांनी तातडीने गावात तिन्ही पथकांसह सर्वेक्षण केले. गावातील संबंधित किराणा दुकानावर कारवाई करण्यात आली असून शिल्लक भगरीचे पीठ सील करण्यात आले आहे. तसेच विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. रात्री उशिरा अन्न व औषध प्रशासन विभागानेही तपासणी करून पुढील कारवाई सुरू केली आहे. पुणे जिल्हा अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त बी. एम. ठाकूर म्हणाले, भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या पूर्ण भाजून न खाल्ल्यास त्या अपूर्ण राहतात आणि त्यामुळे पचनाशी संबंधित त्रास उद्भवू शकतो.

# राज्यात मुसळधार पावसाची शक्यता; मराठवाडा व विदर्भाच्या काही भागांत अलर्ट

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**

राज्यात सध्या मुसळधार पावसाने थैमान घातले असून अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. नद्यांना पूर आला आहे, शेतजमिनी पाण्याखाली गेल्या आहेत, रस्ते व रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि कोकण विभागात मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने आणखी इशारा दिला असून, 27 सप्टेंबरपासून पावसाचा जोर पुन्हा एकदा वाढणार असल्याचे स्पष्ट केले आहे. बंगालच्या उपसागरात तयार



झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे हा पाऊस अधिक तीव्र होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. हवामान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होऊन ते पश्चिमेकडे सरकत आहे. या प्रभावामुळे 27 ते 29 सप्टेंबर दरम्यान राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाची शक्यता आहे. कोकण विभागात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून, मराठवाडा व विदर्भाच्या काही भागांत विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे आधीच पावसाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना आणखी फटका बसणार असल्याचे दिसत आहे. मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतजमिनीमध्ये पाणी साचले असून, कापूस, सोयाबीन, तूर, भात अशी हंगामी पिके मोठ्या प्रमाणावर नुकसानग्रस्त झाली आहेत.

दरम्यान, पावसाच्या इशाऱ्यामुळे शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांची चिंता अधिकच वाढली आहे. आधीच अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान भरून निघण्याआधीच आणखी एक अस्मानी संकट कोसळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई, ओला दुष्काळ जाहीर करणे आणि तातडीने मदत मिळावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून राज्य सरकारकडे होत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, 27 ते 29 सप्टेंबरदरम्यान मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात मुसळधार पाऊस होणार असून, नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

## पिकांचे नाही तर अनेक पिढ्यांचे नुकसान : संजय राऊत



**मुंबई :** मराठवाड्यात केवळ पिकांचे नाही तर अनेक पिढ्यांचे नुकसान झाले असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. अशा वेळी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारच्या तिजोरीत पैसा नाही. त्यामुळे मिंध्यांच्या तिजोऱ्या रिकाम्या करण्याचे आव्हान संजय राऊत यांनी केले आहे. मराठवाडा शेतीच्या दृष्टिकोनातून पूर्णपणे उध्वस्त झाला आहे, हे या सरकारच्या लक्षात आले का? असा प्रश्न राऊत यांनी उपस्थित केला. मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची घरे, शेती व जमीन मोठ्या प्रमाणात वाहून गेल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्यातील अनेक गावांमध्ये पिकं नष्ट झाली असून, माती वाहून गेल्यामुळे शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उद्धव ठाकरे उद्या मराठवाड्याच्या दौऱ्यावर असणार आहेत.

## वडिलांसमोर बिबट्याने नेले लेकराला



**नाशिक :** वडनेर रेंजरोड येथे महिनाभरापूर्वीच राखीपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला साडेतीन वर्षांच्या आयुषचा बिबट्याने जीव घेतला आणि आता मंगळवारी (दि. २३) रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास घराच्या अंगणातून २ वर्षांच्या श्रुतीकला बिबट्या उचलून घेऊन गेला. नाशिकमधल्या या घटनेने परिसरात प्रचंड भीती पसरली असून आयुषचा मृत्यू झाल्यानंतर मोर्चा काढूनही वनविभागाकडून ठोस अशी कार्यवाही या भागात होत नसल्याने वनविभागाच्या कार्यक्षमतेवर नागरिक प्रचंड संतप्त झाले आहेत. मंगळवारी (दि. २३) रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास आर्टिलरी सेंटर येथे रेकॉर्ड ऑफिसमध्ये कामाला असलेल्या गंगाधरन या जवानाच्या घरापुढेच त्यांचा दोन वर्षांचा मुलगा श्रुतीक होता. बिबट्याने श्रुतीकवर हल्ला करत श्रुतीकला घेऊन जंगलाच्या धूम ठोकली.

## कोंढवा परिसरात १४ वर्षीय मुलावर हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :**

पैसे उधार घेतल्याचे आर्थिक वादातून १४ वर्षीय मुलावर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याची धक्कादायक घटना कोंढवा परिसरात घडली. या घटनेत सदर मुलगा गंभीर जखमी झाल्याने आरोपींवर खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी दाम्पत्याला अटक केली आहे.

या प्रकरणी शाहरुख मोहम्मदीन फिरोज खान, मरियम शाहरुख खान (दोघे रा. हुमेरा मंजिल, शेर खान चाळीसमोर, कोंढवा पुणे) या आरोपींना अटक करण्यात आली. याबाबत जखमी मुलाची आई मासूम उमर शेख (वय ३५, रा. विजय पार्क, शेर खान चाळीसमोर, कोंढवा) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी मुलाचे वडील उमर यांचे आरोपी शाहरूख याच्याशी आर्थिक व्यवहारावरून वाद झाले होते. २२ सप्टेंबर रोजी रात्री पावणेदहा वाजणेच्या सुमारास आरोपी शाहरुख आणि त्याची पत्नी मरियम हे उमर यांच्या घरी आले. त्यावेळी उमर घरात नव्हते. त्यांनी उमर यांना शिवीगाळ केली, तसेच मुलगा यालाही शिवीगाळ केली. त्यावेळी मुलाची आई मासूम यांनी मध्यस्थी केली. तेव्हा आरोपींनी मासूम यांना धक्काबुक्की करत आईला मारहाण केल्यानंतर मुलगा चिडला. त्याने आरोपींना शिवीगाळ केली.

आरोपींनी मुलास शिवीगाळ करुन त्याच्या छातीवर धारदार शस्त्राने वार केले. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. या घटनेची माहिती मिळताच सहायक पोलीस आयुक्त धन्यकुमार गोडसे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनय पाटणकर यांनी घटनास्थळी भेट दिली. आरोपी शाहरूख आणि त्याची पत्नी मरियम यांना अटक करण्यात आली.

# जालन्यात धनगर समाजाचा मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी, जालना, दि. २४ :**

अनुसूचित जमातींमध्ये समावेश करण्याच्या मागणीसाठी धनगर समाजाच्या वतीने बुधवारी जालना शहरात मोठा मोर्चा काढण्यात आला. देवेन्द्र फडणवीस आणि भाजप सरकारला त्यांनी दिलेल्या शब्दासाठी हा महामोर्चा असल्याचा उल्लेख सभास्थानी असलेल्या व्यासपीठावरील फलकावर होता.

दीपक बोहाडे यांनी या मागणीसाठी सुरू केलेल्या उपोषणाचा बुधवारी आठवा दिवस होता. शहरातील गांधी चौकातून उपोषण स्थळी पोहोचल्यावर मोर्चाचे सभेत रुपांतर झाले. यावेळी बोऱ्हाडे वगळता कुणाचेही भाषण झाले नाही. यावेळी त्यांनी आंदोलनाचा पुढील



कार्यक्रमही जाहीर केला.

बो-हाडे म्हणाले, राज्यात सत्ता द्या, मंत्रीमंडळाच्या पहिल्या बैठकीत आरक्षण देतो असे आश्वासन फडणवीस यांनी दिले होते. २०१४ मधील लोकसभा निवडणुकीच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही खांद्यावर घोंगडी घेऊन आणि ढोल वाजवून आरक्षणाची मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. फडणवीस यांना आता ती संधी आहे म्हणून त्यांनी आरक्षणाची मागणी पूर्ण केली पाहिजे. आमची मागणी संवैधानिक नाही आणि बारामतीमध्ये आरक्षणाच्या बाबतीत आपण खोटे बोललो होतो असे सांगून माफी मागून टाकावी! सरकारच्या मुंडक्यावर पाय देऊन आपल्याला आरक्षण घ्यावे लागेल. देवाभाऊ चांगलं माणूस आहे म्हणून आम्ही मोर्चाच्या निमित्ताने त्यांचे फोटो असलेले फलक लावले. परंतु आरक्षणाबाबत फसवणूक झाली तर तोंडाला काळे लाऊ, असेही ते म्हणाले. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी येत्या २६ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व तहसील आणि जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे धरून निवदने द्यावीत, २९ सप्टेंबर रोजी भाजप खासदार आणि आमदारांच्या निवासस्थानांसमोर मेंढरे घेऊन आणि ढोल वाजवून धरणे धरावीत, त्यानंतर १ ऑक्टोबर रोजी राज्यात चक्का जाम आंदोलन करावे, असा कार्यक्रम यावेळी बो-हाडे यांनी धनगर समाजास दिला. आपले उपोषण यापुढेही सुरुच राहील आणि १ ऑक्टोबर रोजी आंदोलनाची पुढील दिशा जाहीर करण्यात येईल.

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी राष्ट्रवादीची थेट भेट योजना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**

मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकरी सध्या आर्थिक आणि नैसर्गिक संकटात सापडले आहेत. उभी पिके बुडालीत गेली, कष्टाची कमाई पाण्यात हरवली आणि काही ठिकाणी जीवितहानीही झाली आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाने शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी थेट हस्तक्षेप करण्याचे पाऊल उचलले आहे. पक्षाचे नेते पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यांच्या अडचणी जाणून घेणार आहेत आणि योग्य ती मदत सुनिश्चित करणार आहेत. बीडमधील शशिकांत शिंदे, सोलापूरचे जयंतराव पाटील आणि हर्षवर्धन पाटील, धाराशिवचे जयंतराव पाटील, यवतमाळ व वाशिमचे अनिल देशमुख, नांदेड-परभणीचे जितेंद्र आव्हाड, जालना येथे राजेश टोपे, अकोला-बुलढाणा येथे डॉ. राजेंद्र शिंगणे, अहिल्यानगरचे रोहित पवार, हिंगोलीचे जयप्रकाश दांडेगावकर आणि जळगावचे प्राजक्त तनपुरे या नेत्यांनी भेटी देण्याचे ठरवले आहे.

या भेटींचा उद्देश फक्त औपचारिक पाहणी नाही, तर शेतकऱ्यांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना करणे आणि संकटग्रस्तांना प्रत्यक्ष आधार देणे हा आहे. पक्षाच्या या थेट हस्तक्षेपामुळे शेतकरी वर्गाला दिलासा मिळणार

## शेतकऱ्यांना १००% नुकसानभरपाई द्या
### मनोज जरांगे पाटलांचा सरकारला इशारा

■ **महासागर प्रतिनिधी, धाराशिव, दि. २४ :**

महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्याला अतिवृष्टीचा चांगलाच फटका बसला आहे. दुष्काळी भाग समजला जाणारा मराठवाडा पूराने वेढला गेला आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरले आहे. अशात मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी पावसामुळे नुकसान झालेल्या धाराशिव जिल्ह्यातील चिंचपुर ढगे व पिंपळगाव येथे भेट दिली. यावेळी त्यांनी सरकारने निकष न लावत जेवढे नुकसान झाले आहे, तेवढी मदत द्यावी.

अन्यथा महाराष्ट्र बंद करण्याशिवाय पर्याय नाही, असा इशारा दिला आहे. मनोज जरांगे यांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त चिंचपुर ढगे तसेच पिंपळगाव परिसरात भेट दिली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा जाणून घेतली.

## पुणे निवडणुकीसाठी २३ विशेष कक्ष

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २४ :**

आगामी महापालिकेच्या निवडणुकीची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली आहे. यासाठी २३ विशेष कक्षांची स्थापना करण्यात आली असून या कक्षांसाठी संबंधित अधिकारी नेमण्यात आले आहेत. नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कामाला सुरुवात करावी, असे आदेश आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. महापालिकेच्या निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या प्रभाग रचनांबाबत आलेल्या हरकती आणि सूचनांवर सुनावणी पूर्ण झाली आहे. सुनावणी घेऊन याबाबतचा अहवाल सनदी अधिकारी व्ही. राधा यांनी नगरविकास विभागाकडे सादर केला आहे. पुढील महिन्यात प्रभाग रचनेची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर होणार आहे.

## समृद्धी महामार्गातील कारंजालाड आणि मेहकर येथे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**



राज्यातील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी हजारो किमी लांबीचे रस्त्यांचे जाळे विणण्याची जबाबदारी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळावर (एमएसआरडीसी) आहे. आता महामंडळ रस्ते तयार करण्याबरोबरच सौरऊर्जा निर्मिती क्षेत्रातही उतरले आहे. नागपूर -मुंबई मसृद्धी महामार्गावरील वाशिम, कारंजालाड आणि बुलढाणा, मेहकर आंतरबदल येथे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पाद्वारे पाच मेगावॉट वीजनिर्मितीस सुरुवात झाली आहे.

मुंबई - नागपूर अंतर केवळ आठ तासात पार करता यावे यासाठी एमएसआरडीसीने ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग बांधला आहे. हा महामार्ग टप्प्याटप्प्याने वाहतूक सेवेत दाखल करण्यात आला असून सध्या संपूर्ण महामार्ग सेवेत दाखल आहे. या महामार्गावरून आतापर्यंत दोन कोटींहून अधिक वाहनांनी प्रवास केला आहे. दरम्यान, या महामार्गालगत कृषी केंद्र, औद्योगिक केंद्र, टाऊनशीपसह सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय एमएसआरडीसीने घेतला आहे. त्यानुसार महामार्गालगतच्या काही आंतरबदल मार्गावर २०४ मेगावॉट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार पहिल्या टप्प्यात कारंजालाड आणि मेहकर येथे नऊ मेगावॉट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाअंतर्गत पाच मेगावॉट वीजनिर्मितीला सोमवारपासून सुरुवात झाल्याची माहिती एमएसआरडीसीकडून देण्यात आली. कारंजालाड येथे ३ मेगावॉट, तर मेहकर येथे दोन मेगावॉट वीजनिर्मिती होणार आहे.

# मुंबई शहर जिल्हा नियोजन समिती बैठक
## जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कामे वेळेत आणि दर्जेदार करा : एकनाथ शिंदे

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**

मुंबई शहर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व विकासकामांचा दर्जा राखून ती वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. विकास कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण झाल्यासच जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधता येईल, असे ते म्हणाले. प्रत्येक योजना नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवून मुंबई जिल्ह्याला सर्व शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये अग्रेसर ठेवण्यावर त्यांनी भर दिला.

वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स येथे उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी कौशल्य, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी



आंचल गोयल, तसेच सर्व लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत 2025-26 या वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत 528 कोटी (सर्वसाधारण योजना) आणि 22 कोटी (अनुसूचित जाती उपयोजना) असा एकूण 553 कोटींचा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी हा निधी मंजूर योजनांवर विहित मुदतीत खर्च करण्याचे निर्देश दिले. तसेच, 2024-25 या वर्षात झालेल्या 509 कोटी रुपयांच्या खर्चाला (सर्वसाधारण योजनेंतर्गत 487.03 कोटी आणि अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत 22 कोटी) बैठकीत मान्यता देण्यात आली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मुंबई शहरातील रखडलेले गृहप्रकल्प प्राधान्याने मार्गी लावले जातील. एसआरए, एमएमआरडीए, सिडको, महानगरपालिका आणि म्हाडा यांसारख्या यंत्रणांनी यासाठी समन्वयाने काम करावे. सामान्य लोकांना न्याय मिळणे हेच शासनाचे उद्दिष्ट असून, लोकप्रतिनिधींनी मांडलेले प्रश्न अधिकाऱ्यांनी प्राधान्याने सोडवावेत, असेही त्यांनी सांगितले.

नागरिकांना चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी 'हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात आला आहे. तसेच, महापालिकेच्या रुग्णालयात येणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांसाठी एमआरआय मशीन उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. मुंबईची जागतिक दर्जाची ओळख कायम राखण्यासाठी स्वच्छता, प्रदूषण कमी करणे आणि वृक्षारोपणासारखे उपक्रम राबवले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी, पावसाळ्यानंतर शहरातील फ्लायओव्हर खड्डेमुक्त करण्याचे आणि पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देशही त्यांनी महानगरपालिका प्रशासनाला दिले. शहराला चांगले वातावरण मिळावे यासाठी उद्यानांचा विकास आणि डागडुजीची कामे प्राधान्याने करावीत, असेही ते म्हणाले. मुंबईतील पोलिसांच्या घरकुलांचा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केले.

## कमी पटसंख्येच्या परीक्षा केंद्राची केली पाहणी

**महासागर प्रतिनिधी**
**गोंडउमरी :** दहावी व बारावीच्या ज्या केंद्रांनी विद्यार्थी संख्येची अट पूर्ण केली नाही. अशा शाळांनी विभागीय शिक्षण मंडळाकडे विशेष प्रस्ताव सादर केले.

त्याची पडताळणी करण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर येथील पर्यवेक्षक श्री. प्रदीप मोहोड साहेब, व शिक्षण उपनिरीक्षक श्री. रवींद्र मोडेमवार साहेब आणि वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प.स. साकोली येथील श्री. हरेष भलावी साहेब यांनी प्रत्यक्ष लाल बहादूर विद्यालय तथा कनिष्ठ कला महाविद्यालय गोंडउमरी. तालुका. साकोली, जिल्हा. भंडारा पहानी केली. समाधान व्यक्त केले.

## वाळु बुकिंग केली असल्यास २९ सप्टेंबर पर्यत वाळु उचल करावी

**भंडारा, दि. २४ :** शासन वाळू धोरण दिनांक १६/०२/२०२४ नुसार भंडारा जिल्हयातील कार्यान्वित मौजा- मोहरना ता.लाखांदुर येथील वाळु डेपो दिनांक ११/०९/२०२५ रोजी बंद करण्यात आला होता. परंतु सदर डेपोमधील बुकिंग केलेल्या ग्राहकांना वाळु उचल करण्यास पुरेसा वेळ न मिळाल्यामुळे, सदर ग्राहकांना वाळु उचल करण्यास ७ दिवसाचा कालावधी देणे आवश्यक आहे. त्यानुसार वाळु बुकिंग केलेल्या ग्राहकांना सुचित करण्यात येते की, सदर डेपोमधुन वाळु बुकिंग केली असल्यास सदर डेपोमधुन दिनांक २९ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाळु उचल करुन घेण्यात यावी. सदर वाळु उचल करण्यास ग्राहकांनी विलंब केल्यास आपण स्वत: जबाबदार राहाल. याकरीता जिल्हा/तालुका प्रशासन जबाबदार राहणार नाही याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी.

# सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाने मेहनत करून काँग्रेसला मजबूत करावे - नाना पटोले

### जनसंपर्क कार्यालय, साकोली येथे सभा आयोजन



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि. २४सप्टेंबर:** भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीची सभा आज साकोली येथील नानाभाऊ यांच्या जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने रणनितीपर विस्तृत चर्चा करण्यात आली. सर्व कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकीत एकदिलाने मेहनत करून काँग्रेस पक्षाचा झेंडा संपूर्ण भंडारा जिल्ह्यात फडकवण्याचा संकल्प केला. तसेच साकोली विधानसभा मतदारसंघातील विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांवर विश्वास ठेवून आज पक्षप्रवेश केला. त्यांचा मनस्वी सत्कार करून काँग्रेस पक्षात त्यांचे स्वागत केले आणि शुभेच्छा दिल्या. या बैठकीस माजीमंत्री श्री. अनिस अहमद, मध्य प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ट उपाध्यक्ष तथा भंडारा जिल्हा प्रभारी खा. डॉ. प्रशांत पडोळे, श्रीमती कुंदा ताई राऊत प्रभारी तुमसर विधानसभा, भंडारा विधानसभा प्रभारी श्री. शकूर नागानी, साकोली विधानसभा प्रभारी श्री. प्रसन्ना तिडके, माजी आ. बंडूभाऊ सावरबांधे, अनिल बावनकर माजी आ., प्रदेश महासचिव जियाभाई पटेल, प्रदेश सचिव जय डोंगरे, भंडारा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. मोहन पंचभाई, महिला जिल्हाध्यक्ष जयश्री बोरकर, मधुकर लिचडे, सफीभाई लध्धानी, धनंजय तिरपुडे, सुरेश मेश्राम यांच्यासह सर्व जिल्हा काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, सर्व तालुका व शहर अध्यक्ष, सर्व आजी माजी जिल्हा परिषद व नगर परिषद सदस्य, सर्व काँग्रेस फ्रंटल, सेलचे अध्यक्ष यांच्यासह सहकार क्षेत्रातील पदाधिकारी उपस्थित होते.

# महाश्रमदानासाठी भंडारा जिल्हा सज्ज गुरूवारी जिल्हाभर स्वच्छतेचा महासंकल्प

***सकाळी ८ ते ९ या वेळेत 'एक दिवस, एक तास, एक साथ'**
*** स्वच्छता महाश्रमदानात सहभागी व्हा : सिईओ श्री. मिलिंदकुमार साळवे**

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि. २४सप्टेंबर:** स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) कार्यक्रमांर्गत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता ही सेवा या मोहिमेदरम्यान उद्या २५ सप्टेंबर २०२५ ला भंडारा जिल्ह्यातील प्रत्येक गावात स्वच्छतेची चळवळ रुजविण्यासाठी 'महाश्रमदान : एक दिवस, एक तास, एक साथ' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. णार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत, गावांमध्ये सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था आणि बाजारपेठा या ठिकाणी एकत्रित स्वच्छता केली जाणार असून या महाश्रमदानात नागरिक, अधिकारी, कर्मचारी यांनी मोठ्या संख्येत सहभागी व्हावे असे आवाहन भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मिलिंदकुमार साळवे यांनी केले आहे. भंडारा जिल्हा परिषदेच्या वतीने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहिम राबविण्यात येत आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता यांचे नेतृत्वा जिल्हाभर स्वच्छता ही सेवा अभियान राबविण्याचे नियोजन करण्यात आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती सर्व यांचे नेतृत्वा या उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान दर दिवशी विविध उपक्रमाद्वारे स्वच्छता ही सेवेची व्यापकता वाढविली जात आहे. उद्या गुरूवारी 'स्वच्छतेकरीता महाश्रमदान : एक दिवस, एक तास, एक साथ' हा विशेष उपक्रम जिल्हाभर राबविण्यात येत आहे. 'स्वच्छतेसाठी फक्त एक दिवस, एक तास द्या; प्रत्येक गाव स्वच्छ करण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यामुळे उद्य गुरूवारी सकाळी ८ वाजता सर्वांनी गावोगावी श्रमदानात सामील व्हावे आणि स्वच्छतेच्या जनचळवळीत आपले योगदान द्यावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मिलिंदकुमार साळवे यांनी केले आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, महिला बचत गट, युवक संस्था, सेवाभावी संस्था तसेच सर्वसामान्य नागरिक उत्साहाने सहभागी होणार आहेत. खासदार, आमदार, जिल्हा परिषद पदाधिकारी, पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्यासह शासकीय विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी, विद्यार्थी सकाळी ८ वाजता श्रमदानात सहभागी होतील.

महाश्रमदान दरम्यान सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते व महामार्ग, रेल्वे स्थानके, घाट, नाले, धार्मिक व आध्यात्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, कार्यालय परिसर, बाजारपेठा, सार्वजनिक वाहतूक केंद्रे, प्राणी संग्रहालय, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्य परिसर येथे एकत्रित स्वच्छता करण्यात येणार आहे.

# तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

### तालुक्यातील १५ संघाचा सहभाग



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली दि. २४सप्टेंबर:** क्रीडा ब युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा, तालुका क्रीडा संकुल समिती साकोली व भंडारा जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन तर्फे आयोजित शालेय १४, १७ व १९ वर्षाखालील मुला-मुलींच्या स्पर्धा साकोली येथील तालुका क्रीडा संकुलच्या मैदानावर आयोजित करण्यात आले.

याप्रसंगी क्रीडा संघटक शाहेद कुरेशी, तालुका संयोजक तुषार मेश्राम, सुनील गजबे, प्रभू संग्रामे, दुधराम मानकर, खराबे, यांच्याप्रमुख उपस्थितीत ग्राउंडची पूजा करण्यात आली. तालुक्यातील संघात नवजीवन विद्यालय, जिल्हा परिषद हायस्कूल सानगडी, पंडित नेहरू विद्यालय सानगडी, लालबहादूर शास्त्री विद्यालय गोंडउमरी, अकॅडमी हायस्कूल, येथील मुला-मुलींचे संघ सहभागी झाले होते. १४ वर्षे मुलांमध्ये प्रथम क्रमांक नवजीवन इंग्लिश स्कूल, मुलींमध्ये प्रथम नेहरू विद्यालय सानगडी. १७ वर्षे मुलांच्या संघात प्रथम लालबहादूर विद्यालय, गोंडउमरी मुलींच्या संघात पंडित नेहरू सानगडी, १९ वर्ष मुलांच्या गटात प्रथम व मुलींच्या संघात प्रथम जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय सानगडी हे संघ विजयी होऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.

स्पर्धेचे रेफरी म्हणून शोएब शेख, अनिकेत नागोसे, रुपेश चिरवतकर, पियुष खोटेले, आर्यन टेंभुर्णे, , गगन खोब्रागडे, युवराज बोबडे, यांनी काम पाहिले. संपूर्ण स्पर्धेचे संचालन क्रीडा संघटक, सचिव शाहेद कुरेशी यांनी तर आभार तालुका संयोजक तुषार मेश्राम यांनी मानले.

जिल्हास्तरासाठी विजयी संघांचे तालुका क्रीडा संकुल समिती तर्फे अभिनंदन करण्यात आले.

# व्यावसायीक अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपर्यत मुदत वाढ

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि. २४सप्टेंबर:** २०२५-२६ या शैक्षणिक वर्गाचे व्यावसायीक अभ्यासक्रमाचे वसतिगृह प्रवेशाचे अर्ज https//hmas mahait.org पोर्टलव्दारे अर्ज स्विकारण्याची मुदत दिनांक १५.०९.२०२५ पर्यंत देण्यात आलेली होती. तथापी, अजूनही वैद्यकीय, अभियांत्रिकी (JEE) आणि मॅनेजमेंट शाखेच्या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक संस्थातील प्रवेशाचे राऊंड सुरू असल्याने सामाजिक न्याय विभागातील व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या वसतिगृह प्रवेशास दि. ३०.०९. २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. करीता, वसतिगृह प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी hips//hmas mahat.org पोर्टलवारे ऑनलाईन अर्ज भरून अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृहास विहीत मुदतीत सादरु करावे, सदरील प्रकरणी कोणतीही अडचण असल्यास संबंधित वसतिगृहाचे गृहपाल किंवा सहायक आयुक्त, समाज कल्याण भंडारा या कार्यालयास त्वरीत संपर्क साधावा, असे आवाहन श्रीमती आशा कवाडे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण भंडारा यांनी केले आहे. अधिक माहीतीसाठी व संपर्कासाठी पत्ता - सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, भंडारा येथे संपर्क साधावा असे आवाहन सहायक आयुक्त आशा कवाडे यांनी केले आहे.

# देवसर्रा गावांत घरफोडी ! चोरट्यांनी लांबवले १ लाख ५ हजार रुपयांचे दागिने व रोख

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि. २४सप्टेंबर:** सिहोरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या देवसर्रा (बपेरा) गावांत बंद घराचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी तब्बल १ लाख ५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी सिहोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नसीर श्याममोहम्मद शेख (वय ४८) हे दिनांक २० सप्टेंबर रोजी त्यांच्या भाचीच्या साक्षगंध कार्यक्रमासाठी सितासावंगी येथे गेले होते. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास ते आपल्या कुटुंबीयांसह घरी परतले. घराचा दरवाजा उघडताच त्यांना दरवाजाचा कोंडा तुटलेला दिसला. शेख यांनी तात्काळ घरात जाऊन तपासणी केली असता, बेडरूममधील कपाटातील लॉकरमधून रोख रक्कम आणि दागिने चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी ७० हजार रुपये रोख, लॉकरमधील पर्समध्ये ठेवलेले ५ हजार रुपये, अंदाजे ५ ग्रॅम वजनाचे २० हजार रुपये किमतीचे सोन्याचे कानातले, २० सोन्याचे मणी असलेली ५ हजार रुपये किमतीची जुनी पोत आणि ५ हजार रुपये किमतीची दोन लहान सोन्याची पदके, असा एकूण १ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला होता. ही घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री १० ते २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेदरम्यान घडली असल्याचे पोलिसांनी सांगितले. नसीर शेख यांच्या तक्रारीवरून सिहोरा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (२०२३) च्या कलम ३३१(३), ३०५(अ) आणि इतर कलमांखाली अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. यामध्ये उपविभागीय अधिकारी मयंक माधव, पोलीस निरीक्षक विजय कसोधन, पो. हवा. वाकलकर आणि पो. उपनिरीक्षक हरिदास सुरपाम यांनी तपास सुरू केला आहे. पोलीस आरोपींचा शोध घेत असून, लवकरच त्यांना अटक करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक या घटनेमुळे भयभीत झाले असून, त्यांनी पोलिसांना परिसरात गस्त वाढवण्याची विनंती केली आहे. या चोरीचा छडा लावून आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# सिहोरा पोलिसांची १२ अवैध दारू विक्रेत्यांवर हद्दपारची कारवाई : तुमसर तालुका सोडण्याचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**
**सिहोरा दि. २४सप्टेंबर:** नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सिहोरा पोलीस स्टेशनने कठोर पाऊल उचलले आहे. पोलिसांनी सिहोरा परिसरातील १२ अवैध दारू विक्रेत्यांवर प्रतिबंधक कारवाई करत त्यांना १० दिवसांसाठी हद्दपार केले आहे. उपविभागीय दंडाधिकारी तुमसर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे नवरात्री दरम्यान शांतता टिकून राहण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बाबद सविस्तर वृत्त असे की, नवरात्र उत्सवादरम्यान पोलीस स्टेशन सिहोरा हद्दीत शांतता राहावी, या करिता अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करणे आवश्यक होते. त्यामुळे सिहोरा पोलिसांनी सिहोरा, दावेझरी, सितेपार, धनेगाव, सोनेगाव, थेरकर टोली, देवसर्रा व चुल्हाड येथील १२ अवैध दारू विक्रेत्यांची यादी तयार केली. यादीतील सर्व आरोपींवर कलम १६३ बी.एन.एस.एस. अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्याची शिफारस करत पोलिसांनी सदर प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी, तुमसर यांच्याकडे पाठविला होता. हद्दपार केलेल्यांची नावे : संजय निमजे रा. सिहोरा, राजू गजबे रा. सिहोरा, शुभम हेडाऊ रा. सिहोरा, सचिन इनवते रा. दावेझरी, बबलू भोयर रा. दावेझरी, श्रीराम चुधरे रा. सितेपार, राजेश्वर मालाधरे रा. धनेगाव, धनलाल तांडेकर रा. सोनेगाव, जयराम थेरकर रा. थेरकर टोली, जितेंद्र शेरकर रा. शेरकर टोली, राधेश्याम कोचे रा. देवसर्रा, विलास बन्सोड रा. चुल्हाड, उपरोक्त सर्व




अवैध दारू विक्रेत्यांवर विचार करून उपविभागीय दंडाधिकारी, तुमसर यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश अनुसार त्यांना दि. २३ सप्टेंबर २०२५ ते दि. २ ऑक्टोबर २०२५ पर्यंत १० दिवसांकरिता तुमसर तालुक्यातून हद्दपार करण्याचे आदेश दिले आहे.

# भंडाऱ्यात महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि. २४सप्टेंबर:** १८ सप्टेंबर भंडाऱ्यात महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेचा अमृत मेळावा पार पडला. खुल्या प्रवर्गातील लक्षित गटातील व्यावसायिक तसेच व्यवसायोत्सुक युवक- युवती यांसाठी हा विशेष मेळावा आयोजित करण्यात आला. मेळाव्यात अमृत संस्थेच्या विविध योजना, उपक्रम तसेच उद्योजकते संदर्भातील संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.



या कार्यक्रमात नागपूर विभागाचे व्यवस्थापक श्री. देवदत्त पंडित यांनी अमृत संस्थेची माहिती व संस्थेच्या योजनांचे महत्व प्रत्यक्ष उदाहरणांसह स्पष्ट केले.

यावेळी नागपूर नागरिक सहकारी बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. प्रवीण उपासनी यांनी बँकेच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उद्योजक कसा आपला व्यवसाय विस्तारू शकतो व उन्नतीच्या मार्गावर जाऊ शकतो याचे मार्गदर्शन केले.

महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने स्नेहल खानापूरकर ताई यांनी 'महिला सक्षमीकरण, सबलीकरण' या विषयावर उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. 'महिला सक्षमीकरणाच्या कार्यक्रमांतून महिलांना आत्मनिर्भरतेचा मार्ग खुला झाला आहे', असे प्रतिपादन त्यांनी या वेळी केले. मेळाव्याचे संपूर्ण नियोजन जिल्हा व्यवस्थापक ओमकार हरदास, अमृत मित्र हेमंत चंदवासकर व अमृत सखी साक्षी जोशी यांनी सक्षमपणे केले. त्यांना गोंदिया जिल्हा व्यवस्थापक कार्तिक तिवारी व नागपूर जिल्हा उपव्यवस्थापक ओमकार गांधी यांचीही मोलाची साथ लाभली.

कार्यक्रमादरम्यान श्री. सदानंद पातुरकर यांनी वैयक्तिक व्याज परतावा या योजनेचा लाभ घेताना आलेले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. तसेच सिम्मी बुधवानी यांनी अमृतपेठवर आपल्या उत्पादनांची नोंदणी करून कसा फायदा झाला याचा अनुभव सांगत 'अमृतपेठ हे उद्योजकांसाठी एक सक्षम व युजर-फ्रेंडली डिजिटल खरेदी विक्री प्लॅटफॉर्म आहे' असे प्रतिपादन केले.

या मेळाव्यामुळे भंडाऱ्यातील उद्योजक व महिला गटांना नव्या संधींचा परिचय झाला असून, आगामी काळात उद्योजकतेला नक्कीच नवे बळ मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# सभापतींविरोधात संघर्ष चिघळला

## अधिकारी, कर्मचाऱ्यांचे लेखनीबंद आंदोलन कायम, माफी मागेपर्यंत आंदोलन सुरूच

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि. २४सप्टेंबर:** पंचायत समितीच्या सभापतींनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात केलेल्या असभ्य वक्तव्यांमुळे कर्मचाऱ्यांनी पुकारलेले लेखनीबंद आंदोलन कायम आहे.

जोपर्यंत सभापती जाहिर माफी मागत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचा पवित्रा अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी घेतल्याने हा संघर्ष अधिक चिघळू लागला आहे.

पंचायत समितीचे सभापती ललित हेमणे यांनी १९ सप्टेंबर रोजीच्या सभेत अधिकारी व कर्मचाऱ्यांशी अशोभनीय वर्तन केल्याचा आरोप करत २२ सप्टेंबरपासून आंदोलनाची सुरुवात झाली. सोमवापासून ठप्प झालेला शासकीय कारभार आज दुसऱ्या दिवशीही बंद राहिल्याने जनतेची कामे रखडली आहेत.

योजनांचे प्रस्ताव, विविध प्रमाणपत्रे, शासकीय मदत यासाठी येणाऱ्या नागरिकांना वारंवार हेलपाटे घ्यावे लागत असून जनतेत प्रचंड नाराजी पसरली आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, सभापतींनी सार्वजनिक माफी मागेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. गटविकास अधिकारी पुंडलिक जाधव यांनी सभापतींच्या वागणुकीबद्दल रोष व्यक्त केला.

२६ सप्टेंबर रोजी पंचायत समितीची वार्षिक सभा आयोजित केली असून या सभेत वर्षभराचा आराखडा, केलेली कामे या सर्व कामांचा आढावा या आमसभेनिमित्त घेतला जातो.

परंतु, प्रशासन व जनप्रतिनिधी आमने-सामने आल्याने आमसभा होणार की नाही? याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकात चर्चा असून सध्या हा वाद विकोपाला गेला असल्यामुळे काही दिवस तरी शेतकरी व सामान्य जनतेचे पंचायत समिती येथील वेगवेगळे व विभिन्न कामात खोळंबा आला असून जनतेच्या कामावर प्रश्नचिन्ह लागले आहे. पंचायत समिती अंतर्गत विविध विभागातील कर्मचाऱ्यांनी रोष व्यक्त केला असून महिला कर्मचाऱ्यांसह सर्वांना मानसिक त्रास झाल्याचे नमुद केले. दुसरीकडे, सभापती ललित हेमणे यांनी मात्र भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवल्यामुळे आपल्या विरोधात खोटे आरोप केले जात असल्याचा पलटवार केला आहे. या संघर्षामुळे पंचायत समितीचे वातावरण अधिकच तापले असून प्रशासन व जनप्रतिनिधी यांच्यातील संघर्ष वाढू लागला आहे. दैनंदिन कामकाज आणि विकासकामे ठप्प झाल्याने जनतेत प्रचंड असंतोष आहे.

प्रशासकीय तसेच राजकीय पुढाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून पंचायत समितीतील वाद संपुष्टात आणावा, अशी मागणी जनतेकडून होत आहे.



आंदोलनात सहभागी पंचायत समितीचे कर्मचारी

# पीएम - यशस्वी योजनेंतर्गत ऑनलाइन अर्ज आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा दि. २४सप्टेंबर:** इतर मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास आणि भटक्या व विमुक्त जातीतील विद्यार्थ्यांना पीएम यशस्वी योजनेतून शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्याकरीता अर्ज करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पीएम-यशस्वी अंतर्गत 'Top Class Education in School for OBC, EBC & DNT Studnts' योजना ही भारत सरकारची एक शिष्यवृत्ती योजना आहे.

या योजनेद्वारे इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास आणि भटक्या व विमुक्त जाती या समाजातील विद्यार्थ्यांच्या इयत्ता ९ ते १२ वीच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत केली जाते. या योजनेचा मुख्य उद्देश या विद्यार्थ्यांमधील आर्थिक दुर्बल घटकांना शिक्षणासाठी आर्थिक आधार देणे हा आहे. जिल्ह्यातील इयत्ता ९ वी ते १२ वीपर्यंत शिकणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज 'पीएम यशस्वी' योजनेंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्याकरीता नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर भरण्यात यावे.

इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास आणि भटक्या व विमुक्त जाती या प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वीपर्यंत उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी निवडक टॉप क्लास शाळांमध्ये शिकण्यासाठी लागणारा संपूर्ण शैक्षणिक खर्च शासकीय मदतीतून भागविणे, हे योजनेचे उद्दिष्ट आहे. लाभार्थी हा इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास आणि भटक्या व विमुक्त जातीया प्रवर्गातील विद्यार्थी असावा. वार्षिक कुटुंबिय उत्पन्न कमाल २ लाख ५० हजार रुपये असावे. मागील वर्षातील गुणांच्या आधारे मेरीट यादीनुसार निवड पद्धत असणार आहे.

किमान ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव आहेत. सलग वर्षामध्ये १०० टक्के निकाल देणाऱ्या सर्वोतम शाळांची निवड करण्यात आलेली आहे अश्याच शाळेमधील प्रवेशित विदयार्थ्यांना अर्ज नोंदनी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जि. प चौक भंडारा येथे संपर्क साधावा. असे आवाहन डॉ. सचिन मडावी, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, भंडारा यांनी केले आहे.

RNI No.- MAHAMAR-2010/35801
महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# स्वस्थ नारी म्हणजे....
# सशक्त परिवाराची पायाभरणी!

स्त्री म्हणून जगतांना खुप काही करावं लागतं आयुष्य तिचे असते पण दुसऱ्यासाठी जगावं लागतं. समाजाच्या आरोग्याचा व देशाच्या विकासाचा पाया म्हणजे स्त्रीचे आरोग्य. कारण नारी हीच एका परिवाराची, समाजाची आणि अखेर राष्ट्राची मूळ शक्ती आहे.

स्त्री निरोगी असेल तरच घर आनंदी असते आणि घर आनंदी असेल तरच समाज सक्षम होतो. हा विचार आपण मान्य केला, तर स्वस्थ नारी - सशक्त परिवार हे घोषवाक्य न राहता भारताची दिशा दाखविणारा विचार आहे व हाच विचार भविष्यातील प्रत्यक्ष आयुष्याचा मंत्र ठरेल.

कारण स्त्री निरोगी असेल तर तिच्या मुलांचे आरोग्य चांगले राहते; घरातील इतर सदस्यांवरही तिचा सकारात्मक परिणाम होतो. परिवारातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य हे आईच्या आरोग्यावर अवलंबून असते. जर आई निरोगी असेल तर तिचे मूलही निरोगी वाढते.

स्त्रीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता तिला नियमित वैद्यकीय तपासणी, मानसिक शांती आणि कुटुंबाकडून आधार मिळाले तर संपूर्ण कुटुंब सक्षम, निरोगी आणि आनंदी राहते. म्हणूनच स्वस्थ नारी हीच सशक्त परिवाराची खरी गुरुकिल्ली आहे. सामाजिक पातळीवर मानसिकता बदलणे, महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आज स्त्रिया शिक्षण, उद्योग, नोकरी, राजकारण या क्षेत्रांत झेपावत असल्या तरी त्यांच्या आरोग्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील निम्म्याहून अधिक स्त्रिया रक्ताल्पतेने ग्रस्त आहेत. प्रसूतीदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा न मिळाल्याने मातामृत्यू दरही चिंताजनक आहे.

ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताल्पता, कुपोषण, प्रसूतीसंबंधी आजार अजूनही चिंतेचा विषय आहेत. शहरी भागात मात्र मधुमेह, स्थूलता, हृदयविकार यांसारखे जीवनशैलीशी निगडीत आजार वाढत आहेत. घरातील जबाबदाऱ्या, नोकरीतील ताण, समाजाच्या अपेक्षा या सगळ्यामुळे स्त्रीच्या आरोग्याकडे सर्वात शेवटी लक्ष दिले जाते.



पण आकडेवारीच्या पलीकडे एक वेगळीच गोष्ट आहे. घरातील स्त्री जर आजारी पडली, तर घरातील वातावरणच बदलून जाते. मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हरवते, वृद्धांना आधार उरत नाही आणि पुरुष अस्वस्थ होतो. कारण नारी ही घराचे हृदय आहे. तिच्या हसण्यात कुटुंबाचे सौख्य दडलेले असते, तर तिच्या थकलेल्या नजरेत घराचे दुःख उमटते.

आज सरकार विविध आरोग्य योजना राबवत आहे, जसे प्रसूतीसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पोषण आहार योजना, महिलांसाठी योग शिबिरे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतागृह सुविधा पण केवळ सरकारी पातळीवर काम करून चालणार नाही. प्रत्येक परिवाराने, समाजाने, कुटुंबाने जागरूक होणे गरजेचे आहे. तसेच, आजच्या आधुनिक समाजात महिला शिक्षण, रोजगार, राजकारण, उद्योग या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असल्या तरी आरोग्याच्या बाबतीत अजूनही मोठ्या अडचणी दिसून येतात.

घरातील प्रत्येकाने हे लक्षात ठेवावे की, मुलींच्या आहाराची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना योग्य आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण देणे, स्त्रियांना नियमित आरोग्य तपासणीस प्रवृत्त करणे, घरकामात पुरुषांनी समतोल सहभाग वाढवणे आणि मानसिक आरोग्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधने. या बाबी महिला आरोग्यासाठी महत्त्वाच्या ठरतात आणि या गोष्टींचा अवलंब झाला तरच स्वस्थ नारी-सशक्त परिवार हा विचार प्रत्यक्षात उतरू शकेल. त्यासाठी कटिबध्द राहणे गरजेचे आहे, तेव्हाच हे शक्य होईल.

आज आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्त्री ही फक्त घर चालवणारी नाही, तीच घर घडवणारी आहे. तिचे आरोग्य बळकट असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि आनंदी कुटुंबातूनच सक्षम राष्ट्र उभे राहते. स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब सशक्त होईल आणि राष्ट्र अधिक प्रगत होईल. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्यापासून सुरुवात करून स्त्रीच्या आरोग्याचे आणि सन्मानाचे रक्षण करणे हिच आजची खरी सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी, निरोगी स्त्री, निरोगी पिढी, आनंदी घर म्हणजे सशक्त समाज आणि सशक्त समाज म्हणजे सक्षम राष्ट्र.

स्त्री पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे. फक्त पुरुषांना आयुष्यभर सुखात राहावं आणि दुःखाची विभागणी संपली पाहिजे. माणूस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे.

ही स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते, भावूक आणि हळवी असते. कुटुंबाचा सांभाळ करते, स्वतःला निराधार वाटत असतांनाही कुटुंबाला आधार देते, पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते. कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायात ही कर्तव्यदक्ष असते. एकंदरीत तिचा सहभाग महत्वाचा हे विसरुन चालणार नाही.

चूल आणि मूल मध्ये गुरुफटलेल्या, चालीरितीच्या कुंपणात वावरणाऱ्या स्त्रीला समाजभय संकोच यामध्ये पार दडपून टाकलेलं, पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. या सबबीनंतर तिने टोकाचे पाऊल उचलून भरारी घेण्याचं ठरवलं. कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीतही मोलाची भूमीका बजावत आहे, अशा या सशक्त नारीला मानाचा मुजरा !



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

# मूर्तीपेक्षा जिवंत देवीचा सन्मान करा!

## नवरात्रीचा खरा अर्थ

नवरात्री म्हणजे भक्तिभावाचा उत्सव, आस्थेचा गजर, श्रद्धेचा जल्लोष आणि शुद्धीकरणाचा पर्व. नऊ दिवस आपण देवीच्या नऊ रूपांची आराधना करतो.

घरोघरी देवीचा गजर, ढोल-ताशांचा नाद, आरतींचा घुमणारा आवाज, दिव्यांच्या प्रकाशात न्हालेली मंदिरे हा सगळा माहोल कितीही भक्तीपूर्ण असला तरी, या नवरात्रीचा खरा संदेश आपण आत्मसात केला का, हा प्रश्न मात्र कायम उभा राहतो. कारण देवी फक्त देव्हाऱ्यात नाही, ती आपल्या घरात, आपल्या कुटुंबात, आपल्या शेजारात आणि समाजात दररोज जिवंतपणे वावरते.



जिवंत देवीचे रूप घरात एक चालती-बोलती लक्ष्मी पाणी उचलते, अंगावर ओझं घेते, घामाचे थेंब गाळते आणि घराला जीवनदायी थंडावा देते. तीच अन्नपूर्णा होऊन सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत कुटुंबासाठी भोजनाचा सुवास पसरवते. भाकर भाजताना तिच्या हातांना लागलेली जळजळही ती मायेच्या हसऱ्या चेहऱ्याने विसरते.गृहलक्ष्मी होऊन ती संसाराच्या गाड्याला तेल घालते, नात्यांना गोडवा देते, घरातील विखुरलेपणाला एकत्र आणते.

कधी सरस्वती होऊन मुलांच्या वहीत अक्षरे उमटवते, त्यांना ज्ञानाची दिशा दाखवते. संकटं आली की तीच दुर्गा बनते, संकटांच्या लाटा छातीवर झेलते. अन्यायाविरुद्ध उभी राहते तेव्हा तिच्यातील कालिका जागी होते. घरातील लहान-मोठ्यांचे रक्षण करते तेव्हा तिच्या रूपात चंडिकेचे तेज चमकते. म्हणजेच ती देवी मूर्तीमध्ये बसवायची गरज नाही. ती आपल्याबरोबरच असते.

तिच्या पायांना रोज चपला लागतात, हाताला भाज्या कापताना ओरखडे लागतात, कधी कपडे धुताना अंगदुखी होते, पण तिच्या मनात मात्र आईसारखी कळकळ, बहिणीसारखा जिव्हाळा आणि मायेचं पाणी सदैव उगवतं. पूजा नाही, सन्मान हवा म्हणूनच तिच्या नावाला फक्त आरत्या नकोत. तिला पाहिजे तो माणुसकीचा सन्मान.

स्त्रीला देवी मानून घरात तिच्याशी आदराने वागलं, तिला निर्णयांमध्ये स्थान दिलं, तिच्या श्रमांचा सन्मान केला, तरच या नवरात्रीचा खरा अर्थ साध्य होईल. आज आपण मंदिरात मूर्तीला हार घालतो, फुलं अर्पण करतो, नारळ फोडतो; पण घरातील स्त्रीच्या डोक्यावर मात्र थोडं प्रेमाचं पाणी शिंपडायला आपण मागे पडतो. तिच्या त्यागाकडे दुर्लक्ष करतो. हाच आपल्या भक्तीचा विसंगतपणा आहे. देवीला देव्हाऱ्यात बसवण्याआधी आपल्या मनात बसवली, तिचा विचार अंगीकारला, तिच्या समानतेची कबुली दिली, तरच पूजा पूर्ण होईल. अन्यथा ढोल-ताशा, आरत्या आणि नाचगाणं हे सगळं केवळ दिखावाच ठरेल.

**खरी सोडायच्या चपला कोणत्या?**

आज अनेक भक्त मोठ्या भक्तिभावाने ₹पायात चप्पल न घालता₹ देवीच्या दर्शनाला जातात. पण खरी हिंमत असेल तर फक्त चप्पल न घालून नाही, तर जीवनातील वाईट चालीरीतींच्या चपला सोडा.

**व्यसनांची चप्पल** : दारू, तंबाखू, गांजा, गुटखा... ही शरीराची, घराची, समाजाची नासाडी करणारी विषारी चपला पायातून काढून टाका.

**अज्ञानाची चप्पल** : अंधश्रद्धा, मूर्खपणा, अडाणीपणा यांचे ओझे वाहण्यात काही अर्थ नाही. ज्ञानाचा प्रकाश मिळवा, विवेकाचा मार्ग स्विकारा.

**वाईट वर्तनाची चप्पल** : दुसऱ्याशी उद्धटपणे, कठोरपणे, हिंस्त्रपणे वागणं थांबवा. नम्रता, मृदुता, सहानुभूती या गुणांनी चालायला शिका.

**अन्यायाची चप्पल** : व्यवहार बुडवणे, खोटं बोलणे, इतरांचा विश्वासघात करणे सोडा. सत्य, प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता या वाटेवर पाऊल टाका.

**मत्सर-द्वेषाची चप्पल** : दुसऱ्याच्या यशावर जळणे, द्वेष बाळगणे, राग धरून बसणे... ही सर्वात विषारी चप्पल आहे. ती सोडल्याशिवाय मनाला खरी शांती मिळणार नाही. हे पायातले नव्हे, तर मनातले पापांचे जोडे काढले तरच देवी प्रसन्न होईल.

**भक्त नव्हे, माणूस बना.**

खरं सांगायचं झालं तर भक्त होणं हे ऐच्छिक आहे. कोणाला श्रद्धा असते, कोणाला नसते. पण माणूस होणं हे मात्र प्रत्येकासाठी बंधनकारक आहे.

आज भक्तीच्या नावाखाली लोकांनी पाखंडीपणाचं वस्त्र परिधान केलं आहे. आरत्या, भजनं, कीर्तनं करताना हात जोडतात; पण घरात परतल्यावर बायकोवर राग काढतात, मुलीला ओरडतात, दुसऱ्याशी अन्याय करतात. हा कोणता भक्तीमार्ग?

देवीची आराधना म्हणजे केवळ हार-नारळ नव्हे. देवी म्हणजे शक्ती, शौर्य, संयम, करुणा आणि न्याय यांचा संगम. ह्या मूल्यांचा अंगीकार केला, तरच आपण खऱ्या अर्थाने भक्त ठरतो. अन्यथा ही सारी भक्ती फक्त मुखवट्यासारखी आहे.

गजानन हरणे
वारकरी समाजसेवक
खडकी, अकोला.
9822942623

**नवरात्रीतील खरा बदल**

नवरात्रीच्या निमित्ताने आपण जर थोडा बदल स्वतःत घडवून आणला, तर प्रत्येक दिवस हा उत्सव बनेल.घरातील स्त्रीला देवी मानून आदर द्या. मुलींना मुलांना शिक्षणाचा संस्कार द्या.

समाजातील वाईट प्रथा, अंधश्रद्धा यांना दूर करण्याचा प्रयत्न करा.व्यसनांना रामराम ठोकून आरोग्यदायी जीवन जगा.माणुसकी, करुणा, सहानुभूती या मूल्यांचा जप करा.हा बदल छोटा का असेना, पण समाजासाठी फार मोठा ठरेल. कारण बदल एकट्या माणसातून सुरू होतो आणि हळूहळू तो संपूर्ण समाजात पसरतो.

**देवी म्हणजे माणुसकी**

आज आपण देवीला घरोघरी बोलावतो. घटस्थापना करतो. देवीच्या मूर्तीवर अब्जावधी रुपये खर्च करतो. मोठमोठे मंडप उभारतो. स्पीकरचा दणदणाट करतो. पण एक गोष्ट मात्र विसरतो देवी ही केवळ मातीच्या मूर्तीमध्ये नाही, ती माणुसकीत आहे.स्त्रीला, शेजाऱ्याला, कामगाराला, शेतकऱ्याला, लहान मुलाला आणि ज्येष्ठ नागरिकाला जर आपण सन्मान दिला, तर तीच खरी देवीपूजा ठरेल.

माणुसकी शिवाय भक्ती म्हणजे पोकळ कळस.नवरात्री म्हणजे केवळ आरत्या, कीर्तनं, भंडारे, जत्रा, ढोल-ताशांचा गजर नाही. नवरात्री म्हणजे आत्मपरीक्षण, आत्मशुद्धी आणि समाजबांधणीचा काळ आहे.आज जर आपण या नवरात्रीत ठरवलं जिवंत देवीचा आदर करायचा, स्वतःला वाईट सवयींपासून मुक्त करायचं, माणुसकीचा दीप प्रज्वलित करायचा, तर प्रत्येक दिवस हा खरा उत्सव ठरेल.

नवरात्रीच्या या पावन पर्वात आपण विसरू नये की देवी फक्त देव्हाऱ्यात नाही, तर मनातही बसली पाहिजे. मूर्तीसमोर डोकं टेकवण्यापेक्षा जिवंत स्त्रीसमोर मान झुकवणं हेच तिचं खरं पूजन आहे. एक वेळ भक्त नाही झालं तरी चालेल; पण माणूस मात्र जरूर बना. कारण भक्तीची खरी कसोटी मंदिरात नाही, तर आपल्या वागणुकीत आहे.

नवरात्रीतल्या या नऊ दिवसांत आपण जर थोडं जरी आत्मपरीक्षण करून आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल केला, तर देवी प्रसन्न होईल आणि हाच नवरात्रीचा सर्वात मोठा विजय असेल. आणि तो बदल करण्यासाठी आपण सर्वांनी पुढे येऊया कालायम नमः.

---

(लेखक, साहित्यिक, समाज सुधारक, कवी, वक्ता, विश्लेषक, प्रबोधनकार, वारकरी आहेत.)

# आरोग्य व्यवस्थेपुढे बदलते संदर्भ....

(कालच्या अंकावरून पुढे)

उत्तरार्ध

मात्र देशातील एकूण औषधी उत्पादनात एक टक्का औषधी बनावट असल्याचा खळबळजनक अहवाल काही महिन्यांपूर्वी पुढे आला होता. ही बाब संपूर्ण देशाच्या सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेने (सीडीएससीओ) १११ औषधी गुणवत्तेच्या चौकटीत नसल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. शिवाय बाजारपेठेत नकली औषधांची विक्री होत असल्याचे म्हणणे होते.

औषधी चाचण्या गुणवत्तेच्या पातळीवर न उतरल्याचे इतके मोठे प्रमाण पहिल्यांदाच निदर्शनास आले होते. अशी औषधी सरकारी रुग्णालयात जर वितरीत झाली असेल, तर रुग्णांच्या बाबतीत अक्षम्य निष्काजीपणाचं उदाहरण ठरेल! भविष्यात बनावट औषधींचा पुरवठा होऊ नये; याकरिता औषध नियंत्रण धोरणात अमुलाग्र बदल करणे अत्यंत गरजेचे आहे.

सार्वजनिक आरोग्यवस्थेच्या वैद्यकीय रिक्त पदाच्या अनुशेषा सोबतच नवीन रुग्णालयाचे उभारणीसाठी मोठ्या निधींची आवश्यकता असते. मात्र ती सुद्धा वेळत उपलब्ध होत नसल्याची खंत आहे. बृहत्आराखड्यानुसार हाती घेण्यात आलेल्या नवीन रुग्णालयाच्या बांधकामांपैकी ६०टक्के कामे अपूर्ण अवस्थेत आहे. त्यातील ९० टक्के कामे हे निधी अभावी रखडलेली आहे.

नव्याने उभी होणारी ४३३ रुग्णालये,प्राथमिक आरोग्य केंद्राची कामे सुरू होऊ शकली नसल्याचे कॅगने उघडीस पाडले होते. बांधकामासाठी मंजूर केलेल्या ३०९ उपकेंद्रांपैकी केवळ १२९कार्यान्वित झाले नाहीत. आरोग्य विभागाला मोठ्या मनुष्यबळ वीज, पाणी, फर्निचर, आरोग्य तपासणी करणारे उपकरणे आदींची मागणी करणारी विनंती मोठ्या प्रमाणात होत असते. परंतु वेळेत निधींची पूर्तता होत नसल्याने हे करणे अवघड होऊन बसते. निधीअभावी राज्यातील आरोग्य व्यवस्थापनाची वाताहत झाली आहे.

खाजगी रुग्णालयाच्या तुलनेत सरकारी रुग्णालयांची अवस्था अतिशय दयनीय आहे. सुसज्ज अशी आरोग्य केंद्राची इमारत दिसते. परंतु स्वच्छतेचा अभाव, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता नसणे, स्त्री पुरुषांना स्वतंत्र स्वच्छतागृहांचा अभाव, तातडीच्या अवस्थेत रुग्ण दाखल झाल्यास डॉक्टरांची अनुपस्थिती, नव्हे नव्हे तर प्राथमिक उपचार करणाऱ्या औषधी सुद्धा नसतात.

प्राथमिक आरोग्य केंद्रातून एखाद्या अत्यवस्थ रुग्णाला जिल्हा रुग्णालयात रेफर केल्या जाते, प्रसंगी रुग्णवाहिका उपलब्ध नसते. असल्यास काही तांत्रिक कारणामुळे उपलब्ध होऊ शकत नाही. वेळेत उपचार न झाल्यामुळे त्या रुग्णांचा बहुतेकदा प्राण गेल्याचे वृत्त कानी पडते.

आज शहरांमध्ये, महानगरांमध्ये ज्या ज्या दर्जाची रुग्णालय उभी झाली आहेत, त्याच दर्जाची सुव्यवस्था निर्माण करणे, तिथल्या मूलभूत सोयी-सुविधा, डॉक्टरांची सुविधा, सुरक्षा, तदवतच रुग्णालयाची सुरक्षा व रुग्णांची हेळसांड होऊ नये,याकडे विशेष लक्ष पुरवल्या गेल्या पाहिजे, तालुका व जिल्हा सरकारी रुग्णालयात दक्षता समितीची नेमणूक झालेली असते. त्या दक्षता समितीमध्ये प्रामुख्याने राजकीय नेतेच असतात. त्यांनी वेळोवेळी रुग्णालयाच्या व्यवस्थापनात दक्ष राहिले पाहिजे.

अनेक सरकारी रुग्णालयात साध्या साध्या उपचारासाठी लागणारी औषधी, उपकरणे यांचा सतत वाणवा असतो.त्यात बायपास सर्जरी,ट्रामा, एन्जोप्लास्टी, अवयरोपण, कर्करोगाचे उपचार, वंधत्व, प्रसुती शस्त्रक्रिया,अस्थिरोग, नेत्ररोग सारख्या शस्त्रक्रिया करणाऱ्या सरकारी रुग्णालय व हाताच्या बोटावर मोजण्या पलीकडे जात नाही. त्यामुळे आज ८० टक्के जनता परवडत नसतानाही खासगी रुग्णालय आणि मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलकडे औषधं उपचार करून घेतात.

सरकारी हॉस्पिटले ही शोभेची वस्तू बनू न पाहता संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या किमान ५० टक्यांनी वाढली पाहिजेत. तरच गरीब व गरजू रुग्णांना, मध्यमवर्गीयांना पैशाच्या अभावामुळे उपचारांपासून वंचित राहावे लागणार नाही.

देशात गरिबांना वैद्यकीय उपचारासाठी आयुष्मान भारत किंवा राज्यस्तरावर महात्मा फुले जन आरोग्य योजना आहेत,त्या योजनेत पाच लाख रुपये एवढ्या खर्चापर्यंतचा उपचार केला जातो. त्यासाठी दीड लाखांपेक्षा कमी उत्पन्न दाखला असलेल्या व्यक्तींनाच नाव नोंदविता येते. त्यानंतर सरकार व त्या व्यक्तीच्या नावाने खाजगी किंवा निमसरकारी कंपनीचा विमा उतरवते.

हे झाल्यावर ती व्यक्ती आयुष्मान भारत योजनेमध्ये नोंदवलेल्या कोणत्याही खाजगी किंवा सरकारी हॉस्पिटल मध्ये उपचार घेऊ शकते.थोडक्यात सांगावयाचे झाल्यास या योजना म्हणजे विमा योजना आहेत. तज्ञांच्या मते आज भारताला विमाधिष्ठित आरोग्य योजनांची नव्हे, तर सेवाधिष्ठित उपचारांची खरी गरज आहे. करिता सार्वजनिक आरोग्य सेवेमध्ये कच्चे दुवे दूर सारावे लागतील.

देशातील तळागाळातील सामान्य नागरिकांना गरिबीतून बाहेर काढायचे असल्यास शिक्षणाबरोबर आरोग्यसेवा भक्कम होण्यास विशेष भर दिला पाहिजे. राज्य सरकारने मागील दोन वर्षापासून सरकारी रुग्णालयात ओपीडीच्या माध्यमातून मोफत औषधोपचार (नोंदणी शुल्काविना) होतात. तो निर्णय स्वागर्तार्ह आहे. त्याचबरोबर आरोग्य सेवेतील मोठ्या अडचणीकडे कानाडोळा होता कामा नये.हीच माफक अपेक्षा राहील.

आज आरोग्य सेवा ही मोफत होण्याऐवजी मुक्त व्हायला हवी. आरोग्य तज्ञांच्या मते'आरोग्य सेवा हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार असला पाहिजे आणि नागरिकांचे आरोग्य ही सरकारची जबाबदारी असली पाहिजे!' या साऱ्या सुधारणा करण्यासाठी शासनाला मोठ्या निधींची गरज भासते.

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुनिश्चित व सुव्यवस्थापित करण्यासाठी शासनाला मोठ्या निधीची गरज भासते.करिता केंद्रीय व राज्यस्तरीय अर्थसंकल्पात देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) जेमतेम दीड ते दोन टक्के आरोग्य सेवेवर खर्च होतो. त्यात आजची गरज पहाता आठ टक्यांहून अधिक निधी आरोग्य सेवेसाठी राखून ठेवला जावा, असे तज्ञांचे मत ठरते.

केंद्र शासनाच्या नीती आयोगाने राज्याच्या अर्थसंकल्पात आठ टक्के रक्कम आरोग्य सेवेसाठी राखून ठेवली पाहिजे असी स्पष्ट भूमिका घेतली आहे, आरोग्य विभागाला अर्थसंकल्पात मोठ्या प्रमाणात निधी मिळाला पाहिजे, हे प्रत्येक राजकीय पक्ष मान्य करीत असला तरी सत्तेवर आल्यानंतर प्रत्यक्षात अर्थसंकल्पात आरोग्य विभागाला निधी वाटण्यात तोंडाला पाने पुसली जातात.

आज राज्यातील आरोग्य व्यस्थेच्या बळकटीसाठी उत्तम आरोग्य सेवे सोबतच कुशल वैद्यकांची तद्वतच आरोग्यवस्थेत संशोधकांची नितांत गरज आहे. आज जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आरोग्य व्यवस्थेला बळकटी आणणे प्रयत्नांती शक्य आहे. २५ सप्टेंबरला जागतिक आरोग्य संघटनेची बैठक न्युयॉर्क येथे संपन्न होत आहे. त्यात जगभरातील अनेक देशांना आरोग्यवस्था सुधारणा तत्त्वांचा अभ्यास व ध्येय धोरणे ठरविली जातील. जी देशातीलच नव्हे संपूर्ण जगभरातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यास महत्त्वाचा दुवा ठरेल.

---

शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

## मराठवाड्यात दुष्काळ ते पूर
# धरण व्यवस्थापनाची शाश्वत गरज

मराठवाडा म्हणजे दुष्काळाची भूमी ही प्रतिमा दीर्घकाळापासून डोळ्यासमोर होती. वर्षानुवर्षे कमी पावसामुळे शेतकरी जलसाठ्याच्या प्रतिक्षेत राहायचा. मात्र यंदा चित्र पूर्ण उलटं दिसलं. काही दिवसांतच झालेल्या अतिवृष्टीमुळे नदी-नाले तुडुंब भरले, धरणसाठे क्षमतेपलीकडे गेले आणि अचानक पुरासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे दुष्काळापासून पूरापर्यंत हा प्रवास डोळ्यादेखत घडला.



दिपक कैतके

मराठवाड्यात एकूण सुमारे ८७ धरणं आहेत. यात मोठी, मध्यम आणि लहान अशी धरणांची विभागणी आहे. या धरणांची एकत्रित साठवण क्षमता कोट्यवधी घनमीटर आहे. परंतु धरणांचे व्यवस्थापन ही खरी समस्या आहे.

काही धरणांमध्ये पाऊस सुरू होताच दरवाजे उघडले जातात. कारण दीर्घकाळ गाळ साचल्यामुळे उपयुक्त पाणी साठवण क्षमता कमी होते. दरवाज्याजवळील गाळामुळे पाणी रोखून धरण सुरक्षित ठेवणे धोकादायक ठरते, म्हणून थोड्या पावसानंतरही पाणी सोडण्याची वेळ येते. यामुळे खालच्या गावांमध्ये अचानक पूरस्थिती निर्माण होते.

एकाच मोठ्या धरणावर संपूर्ण भागाचा विसंबून राहण्याचा तोटा येथे प्रकर्षाने जाणवतो. जर लहान-लहान धरणं, शेततळी, पाझर तलाव जागोजागी उभारले गेले, तर पावसाचं पाणी साठवण विखुरली जाईल. याचा थेट फायदा म्हणजे भूजल पातळी वाढेल, शेतीला वर्षभर पाणी मिळेल आणि मोठ्या धरणातून अचानक पाणी सोडण्याची वेळ कमी येईल.

आजची पूरस्थिती ही केवळ अतिवृष्टीची नाही तर धरण व्यवस्थापनातील त्रुटी आणि दीर्घकालीन नियोजनाच्या अभावाची देणगी आहे. ज्या मराठवाड्याने दुष्काळाची झळ सोसली, तिथे आज गावोगाव पाणी घरात घुसलं आहे, जनावरे वाहून गेली आहेत. या टोकाच्या दोन परिस्थितींमध्ये संतुलन साधण्यासाठी वैज्ञानिक पातळीवर धरण व्यवस्थापन, गाळ काढण्याची मोहीम, आणि लहान जलस्त्रोत निर्मिती या उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे.

मराठवाडा खऱ्या अर्थाने दुष्काळ ते पूर या दुष्टचक्रातून बाहेर पडायचा असेल, तर पावसाचे पाणी धोक्यात नाही तर साठ्यात ठेवणं हाच शाश्वत मार्ग आहे.

# मंदिरातले दर्शन आणि शुल्क व्यवस्था!

वाचक लिहितात

मंदिरात जाऊन भगवंताचे दर्शन घेतल्याने आपल्याला देवाजवळ असल्याची अनुभूती मिळते. तेथील शांत, पवित्र वातावरणामुळे सकारात्मक ऊर्जेचा लाभ होतो. उत्सव-सणांच्या काळात मंदिरात दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी असते. देवदर्शनाला येणाऱ्या भाविकांना जर घाई असेल, त्यांतील कुणी आजारी असेल किंवा वृद्ध असेल, रांगेत उभे राहून दर्शन घेणे ज्यांना कठीण होत असेल, अशांसाठी दर्शन पासची व्यवस्था मंदिर प्रशासन करत असते.

नवरात्रोत्सव प्रारंभ झाला आहे. या दरम्यान साडेतीन शक्तीपीठांपैकी एक पूर्ण पीठ आणि महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या श्रीक्षेत्र तुळजापूर येथील श्री भवानीमातेच्या मंदिरात दर्शन पासाचे शुल्क वाढवले आहे. २०० रुपयांच्या देणगी दर्शन पासचे शुल्क ३०० रुपये, तर ५०० रुपयांच्या पासचे शुल्क दुप्पट म्हणजे १,००० रुपये इतके करण्यात आले आहे.

केवळ हेच मंदिर नव्हे, तर मागील काही वर्षांत अनेक मंदिरांमध्ये सशुल्क प्रवेशाची पद्धत सुरू करण्यात आली आहे. तिरुपती येथील श्री बालाजी देवस्थान, शिर्डी येथील श्री साईबाबा मंदिर आदी ठिकाणीही भाविकांकडून पैसे घेऊन दर्शन दिले जाते. दर्शन शुल्क या नावाने घेतला जाणारा पैसा मंदिराच्या तिजोरीतच जमा होतो. तो निधी मंदिराच्या विकासकामांसाठी वापरला जाणार असल्याचे प्रशासन सांगते. सुलभरित्या दर्शनासाठी पैसे देणे हे व्यवहाराच्या दृष्टीने निश्चितच चुकीचे नाही. मात्र देवदर्शन हा काही व्यवहार नाही.

व्यवहारात एखादी गोष्ट पैशाने विकत घेता येते; परंतु ईश्वरप्राप्तीसाठी, आत्मिक शांतीसाठी समर्पणभावाने साधनाच करावी लागते. म्हणूनच मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांवर समर्पित होऊन साधना करावी, हा संस्कार बिंबवण्यासाठी मंदिर प्रशासनाने प्रयत्न करायला हवेत. सोबतच मंदिरात दर्शन घेताना तेथील पावित्र्याचा अधिकाधिक लाभ व्हावा, यासाठी कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या टाळाव्यात, याबाबत भाविकांचे प्रबोधन केले पाहिजे. मंदिरे ही आर्थिक प्राप्तीसाठी नसून, आध्यात्मिक लाभ देण्यासाठी आहेत. म्हणूनच देव आणि भाविक यांतील आध्यात्मिकतेसाठी बांधील राहणे हे मंदिरांचे खरे कर्तव्य आहे.

रेणुका हरदास, नागपूर.



# नवरात्रीच्या उपवासात या भाज्या टाळा

शारदीय नवरात्र २२ सप्टेंबर रोजी सुरू झाले आहेत. या नऊ दिवसांत लोक देवी दुर्गाची पूजा करतात आणि नऊ दिवसांचे उपवास करतात. काहीचे फार कडक व्रत असते तर काहीजण फलहार घेऊन उपवास करतात.

उपवास म्हणजे फक्त अन्न वर्ज्य करणे असे नाही. या दिवसांत शुद्ध, सात्त्विक अन्न सेवन केले जाते, तसेच मन आणि कृती शुद्ध ठेवल्या जातात. मन शांत ठेवण्यासाठी आणि दुर्गाच्या उपासनेत स्वतःला समर्पित करण्यासाठी हलके, सात्त्विक, फळांवर आधारित जेवण करणे आवश्यक असते.

अन्न वर्ज्य करण्यासोबतच, नऊ दिवसांच्या उपवासात अनेक प्रकारच्या भाज्या देखील निषिद्ध मानल्या जातात.

**उपवासात या भाज्या खाणे टाळले पाहिजे**

जर तुम्ही दिवसभर उपवास करून रात्री सोडत असाल तर उपवास सोडण्यासाठी, तसेच नैवद्यासाठी देखील या भाज्या कधीही करू नका.अन्यथा उपवास मोडू शकतो म्हणजे तो धरलाच जाणार नाही असे म्हटले जाते.

**लसूण-कांदा** : लसूण आणि कांद्यामध्ये तामसिक गुण असल्याचे मानले जाते. म्हणूनच, धार्मिक समारंभात लसूण आणि कांदे खाण्यास नेहमीच मनाई आहे. त्यामुळे नवरात्रात देखील या लसूण कांद्यापासून बनवलेल्या भाज्या उपवास सोडण्यासाठी खाऊ नका.



**वांगी** : वांगी हा शुद्ध आहार मानला जात नाही, म्हणून उपवास करताना वांगी खाण्यास पूर्णपणे मनाई असते. त्यामुळे उपवास सोडण्यासाठी वांग्याची भाजी कधीही करू नका.

**कोबी आणि संबंधित भाज्या** : कोबीला एक विशिष्ट वास असतो, म्हणूनच ती भाजी तसेच, त्याच्याशी संबंधित भाज्या जसे की फुलकोबी, ब्रोकोली आणि लाल कोबी अशा भाज्या खाणे टाळल्या पाहिजे.

**मुळा** : मुळ्याला देखील एक उग्र वास असतो. त्यामुळे नवरात्रीच्या उपवासात ती खाण्यास मनाई केली जाते.

**वाटाणे** : नवरात्रीत वाटाणे आणि चवळी सारख्या शेंगा खाल्ल्या जात नाहीत. त्याचप्रमाणे मक्याला धान्य मानले जाते. म्हणून, उपवासाच्या वेळी मका खाण्यासही मनाई असते.

**कॅप्सिकम आणि भेंडी** : भेंडी आणि शिमला मिरचीचा वासही तीव्र असतो, म्हणूनच उपवासाच्या वेळीही या भाज्या खाणे टाळल्या पाहिजे.

**आरोग्याबाबत कारणः** तसेच आरोग्याच्या दृष्टीने विचार केला तर दिवसभर तुम्ही उपवास करून या भाज्यांनी उपवास सोडला तर नक्कीच तुमचे पोट बिघडू शकते. तुम्हाला त्रास होऊ शकतो.

या सर्व भाज्या उष्ण, तामसी असतात. त्यामुळे शक्यतो उपवासामध्ये हलका आहार घेणेच गरजेचं आहे.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### परतीचा पाऊस

परतीच्या पावसानं
भलताच केला कहर
त्रासापायी बळीला
घ्या वाटते जहर ..!

कपाशीचे बोंड
जागीच सडले
सोयाबीनला ही
भौ कोंब फुटले ..!

आम्ही तुझे आश्रीत
तूच आमचा दाता
सांग, निसर्गा कुणाकडे
व्यथा सांगावी आता ?

## कोटक लाईफ सादर करीत आहे 'एज' रेग्युलर गॅरंटीड इन्कम प्लॅन

**मुंबई, २४ सप्टेंबर :** कोटक महिंद्र लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड वित्तीय सुरक्षेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे जीवन सक्षम करण्याच्या आपल्या कार्याचे २५ वे म्हणजेच रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करत असताना कंपनीने कोटक एज (एर्ली डिफाईन्ड गॅरेंटेड अर्निंग्ज) हा नवीन इन्शुरन्स प्लॅन आणला आहे. हे कॉम्प्रीहेन्सीव्ह लाईफ इन्शुरन्स सोल्यूशन आजच्या युगातील ग्राहकांच्या बदलत्या वित्तीय गरजांची पूर्तता करते.

आजच्या गतीमान युगात ग्राहकांना अनेक वित्तीय गरजांना सामोरे जावे लागते आणि त्या तत्काळ पुर्ण करणे गरजेचेही असते. ही तातडीची गरज कोटक एज इन्शुरन्स प्लॅन पूर्ण करतो. हा प्लॅन रेग्युलर इन्कम प्रदान करत असल्याने अतिरिक्त उत्पन्नाच्या स्त्रोतातून पॉलिसीधारकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करतो. या प्लॅनमधील इन्कम ऑन डिमांड ही सुविधा जीवनातील तातडीच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेली आहे.

इमेजीएट लिक्विडीटी आणि लॉन्ग टर्म गॅरंटीड इन्कम यांच्या संयोजनातून कोटक एज पॉलिसीधारकाला रेग्युलर पेआऊट, अर्लीरेग्युलर इन्कम, गॅरंटीड रिटर्न्स आणि कॉम्प्रीहेंसिव्ह लाईफ कव्हर या सर्व सुविधा एकाच प्लॅनमध्ये प्रदान करते.

नवीन योजनेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना महेश बालसुब्रमणीयन म्हणाले, आमचे वित्तीय पर्याय हे आमच्या ग्राहकांच्या जीवनासोबत विकसित झाले पाहिजे, या विश्वासावर आमची २५ वर्षांची वाटचाल साकारली गेली आहे. कोटक एज हा याच तत्वावर आधारलेला एक वित्तीय पर्याय आहे तो लॉन्ग टर्म प्रोटेक्शन आणि फायनान्शिअल स्टॅबिलिटीशी कोणतीही तडजोड न करता अर्ली इन्कम सपोर्ट प्रदान करतो. आम्ही भविष्याचा वेध घेत असताना, ग्राहकांप्रती सहानुभूती आणि नाविन्यपूर्णतेसाठी वचनबद्ध आहोत. तसेच आमच्या ग्राहकांना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर अतिशय आत्मविश्वासाने जगण्यास सक्षम बनवत आहोत.

कोटक लाईफने आर्थिक स्थिरता आणि ग्राहक सेवेवर आपले लक्ष केंद्रित केले, हे कंपनीच्या आर्थिक कामगिरीतून प्रतिबिंबित होते. ३१ मार्च २०२५ पर्यंत, कंपनीने ९८.६% क्लेम सेटलमेंट रेशो, नॉन-इन्व्हेस्टीगेटीव्ह क्लेमसाठी वन-डे सेटलमेंट आणि सॉल्व्हन्सी रेशो २.८६इतका राखला आहे.

## मिडास हॉस्पिटलला अमेरिकेतील डॉ. कुलविंदर दुआ यांच्या हस्ते 'वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर' म्हणून मान्यता मिळाली

**नागपूर, २४ सप्टेंबर :** नागपूरमधील प्रमुख आरोग्यसेवा संस्थांपैकी एक असलेल्या, वर्धा रोड नागपूर येथील मिडास हॉस्पिटलला हे जाहीर करताना आनंद होत आहे की त्यांना वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन (डब्ल्यूईओ) ट्रेनिंग सेंटर म्हणून मान्यता मिळाली आहे. ही मान्यता अमेरिकेतील सुप्रसिद्ध एंडोस्कोपी तज्ज्ञ आणि डब्ल्यूईओच्या 'आउटरीच कमिटी' चे अध्यक्ष डॉ. कुलविंदर दुआ यांच्या हस्ते दिली जाणार आहे.




या निमित्ताने मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरमध्ये एका छोट्या समारंभाचे आयोजन करण्यात आले, ज्यात रिबन कापण्याचा समारंभ आणि प्रमाणपत्र आणि प्लॅकचे अनावरण करण्यात आले. वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर ही प्रतिष्ठित मान्यता डॉ. कुलविंदर दुआ यांनी मिडास हॉस्पिटलचे डायरेक्टर, डॉ. श्रीकांत मुकेवार आणि डॉ. सौरभ मुकेवार यांना प्रदान केली.

इंटरनॅशनल एक्स्पर्ट डॉ. कुलविंदर दुआ, अमेरिकेतील विस्कॉन्सिन मेडिकल कॉलेजमधील गॅस्ट्रोएन्टरॉलॉजीचे प्राध्यापक आणि प्रसिद्ध एंडोस्कोपी तज्ज्ञ, एंडोस्कोपीतील नवीनतम तंत्रज्ञान आणि महत्त्वाची माहिती शेअर करणार आहेत. वर्धा रोड, नागपूर येथील मिडास हॉस्पिटल आता आंतरराष्ट्रीय डॉक्टरांना एंडोस्कोपीमध्ये प्रशिक्षण देणार आहे, ज्यात लिव्हरवरील अत्याधुनिक एंडोस्कोपी प्रक्रियाचे लाइव्ह डेमो देखील दाखवले जाणार आहेत. गेल्या वर्षभरात इटली, फ्रान्स, रुवांडा, साउथ आफ्रिका, युएई, ओमान, फिलिपिन्स यांसह अनेक देशांतील डॉक्टरांनी पुढील प्रशिक्षणासाठी मिडास हॉस्पिटलला भेट दिली आहे.

मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरला वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशन ट्रेनिंग सेंटर म्हणून मिळालेली मान्यता ही नागपूर आणि मध्य भारतात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गॅस्ट्रोएंटरॉलॉजी व एंडोस्कोपी सेवा देण्याच्या त्याच्या बांधिलकेचे प्रतीक आहे. या सहयोगाचा उद्देश भारतातील वैद्यकीय व्यावसायिकांचे कौशल्य वाढवणे आणि एंडोस्कोपीमध्ये आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती लागू करणे आहे.

मिडास हॉस्पिटल, वर्धा रोड, नागपूरचे डायरेक्टर आणि सिनियर गॅस्ट्रोएंटरॉलॉजिस्ट डॉ. श्रीकांत मुकेवार यांनी सांगितले, आम्हाला डॉ. कुलविंदर दुआ यांचे स्वागत करताना आनंद आणि अभिमान वाटत आहे, तसेच वर्ल्ड एंडोस्कोपी ऑर्गनायझेशनकडून मिळालेल्या मान्यतेबद्दल आम्हाला गर्व वाटत आहे. ही मान्यता मिडास हॉस्पिटलच्या एंडोस्कोपी प्रशिक्षण कार्याला आणखी मजबूती देईल आणि यामुळे रुग्ण तसेच वैद्यकीय क्षेत्रालाही मोठा फायदा होईल, असे डॉ. सौरभ मुकेवार, डायरेक्टर आणि सिनियर गॅस्ट्रोएंटरॉलॉजिस्ट यांनी नमूद केले.

## मदर्स पेट किंडरगार्टनने २०२६२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली, लहान शिकणाऱ्यांसाठी समृद्ध अभ्यासक्रमाची घोषणा



**नागपूर, २४ सप्टेंबर :** मध्य भारतातील अग्रगण्य प्री-स्कूल ब्रँड मदर्स पेट किंडरगार्टन, ज्याची ४७ वर्षांची परंपरा आहे, यांनी शैक्षणिक सत्र २०२६२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्याची घोषणा केली आहे. प्रवेश सर्व शाखांमध्ये सदर छावणी, वर्धमान नगर, खामला स्क्वेअर आणि अमरावती रोड बायपास येथील प्ले स्कूल, नर्सरी, ज्युनियर केजी आणि सिनियर केजी वर्गांसाठी खुले आहेत.

मदर्स पेट किंडरगार्टनचा विश्वास आहे की आयुष्यातील सुरुवातीची वर्षे ही व्यक्तिमत्त्व घडवणारी असतात हीच ती महत्त्वाची वेळ असते जेव्हा ठरते की मूल पुढे कसे विचार करेल, शिकेल आणि प्रगती करेल. ह्याच विचारातून २०२६२७ शैक्षणिक सत्रात 'करिकुलम २.०' ची सुरुवात केली जात आहे. ही नवी पिढी लक्षात घेऊन तयार केलेली योजना मुलांमध्ये जिज्ञासा, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी बनवली आहे. खेळ-आधारित शिक्षणावर आधारित हा अभ्यासक्रम जागतिक सर्वोत्तम पद्धती आणि बालकेंद्रित दृष्टिकोन यांचे मिश्रण असून, रेज्जियो एमिलिया तत्त्वज्ञान, मॉन्टेसरी आणि डिझाइन थिंकिंगच्या सिद्धांतांपासून प्रेरित आहे.

नवीन अभ्यासक्रम आणि प्रवेशाच्या सुरुवातीबद्दल मदर्स पेट किंडरगार्टनच्या डायरेक्टर प्रिन्सिपल सुश्री कल्पना धरेश्वर म्हणाल्या, मदर्स पेट किंडरगार्टनमध्ये आम्ही मानतो की खेळ हे शिकण्यापासून वेगळे नाहीतेच खरे शिक्षण आहे. सुरुवातीची वर्षे मुलांच्या विचारांची, शोधण्याची आणि वाढीची दिशा ठरवतात. आमचा नवीन अभ्यासक्रम जागतिक सर्वोत्तम पद्धती आणि बालकेंद्रित दृष्टिकोन यांचे संमिश्रण आहे, जो शिक्षणाची आनंददायी, आकर्षक आणि अर्थपूर्ण सुरुवात घडवतो. नवीन शैक्षणिक सत्रासाठी प्रवेश सुरू करताना, आमचे ध्येय प्रत्येक मुलामध्ये जिज्ञासा वाढवणे, आत्मविश्वास वृद्धिंगत करणे आणि आजीवन शिक्षणाची आवड निर्माण करणे आहे.

या सर्व घटकांमुळे नवीन अभ्यासक्रम केवळ शैक्षणिक तयारीच नव्हे तर जीवनकौशल्ये देखील विकसित करतो, ज्यामुळे आयुष्यभराच्या यशाची पायाभरणी होते.

## पीएनजी ज्वेलर्सचा भव्य उत्सवी विस्तार

**नागपूर, २४ सप्टेंबर :** परंपरा, प्रगती आणि ग्राहकांचा विश्वास यांचा अद्भुत उत्सव साजरा करताना, १९३ वर्षांचा वारसा असलेला शुद्धता आणि कारागिरीसाठी प्रसिद्ध असलेला भारतातील दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स' या नवरात्रीत आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठणार आहे. 'पीएनजी ज्वेलर्स' तब्बल ६ स्वतंत्र दालने आणि ४ 'लाइटस्टाईल' चे शॉप-इन-शॉप काऊंटर सुरु करणार असून, या भव्य विस्तारामुळे महाराष्ट्र आणि मध्य भारतातील 'पीएनजी ज्वेलर्स'ची उपस्थिती अधिक बळकट होणार आहे. नवरात्री हा भक्ती, समृद्धी आणि नावीन्यतेचा उत्सव असून, याच काळात पीएनजी ज्वेलर्स आपल्या परंपरेला आधुनिकतेच्या नजाकतीसोबत जोडत नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करत आहे. मुंबई, पुणे, कोल्हापूर, लखनऊ, कानपूर आणि नागपूरसह प्रमुख शहरांमध्ये होणाऱ्या या दालनांचे उद्घाटन पीएनजी ज्वेलर्सच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि वेगवान विस्तार मोहिमांपैकी एक ठरणार आहे.

या अभूतपूर्व मोहिमेचे औचित्य साधून पीएनजी ज्वेलर्स नवीन दालनांमध्ये सोन्याच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५०% पर्यंत सवलत आणि हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर १००% पर्यंत सवलत देत आहे. तसेच नवीन लाइटस्टाईल शॉप-इन-शॉपला भेट देणाऱ्या ग्राहकांना लाइटस्टाईल दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर ५०% पर्यंत सवलतीचा लाभ मिळणार आहे.

या मोहिमेबद्दल बोलताना, पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, या नवरात्रीत आम्ही केवळ उत्सव साजरा करत नाही आहोत, तर पिढ्यानपिढ्या ग्राहकांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास आणि प्रेमाचाही सन्मान करत आहोत. या नवरात्रीत १० ठिकाणी दालन सुरु करणे ही आमच्यासाठी ऐतिहासिक घटना आहे. यामधून आम्ही शुद्धता, कारागिरी आणि नाविन्य या आमच्या मूळ मूल्यांशीही प्रामाणिक राहत आमच्या ग्राहकांसोबत नाते अधिक घट्ट करत आहोत. पीएनजी ज्वेलर्सच्या दालनांसोबतच लाइटस्टाईल शॉप-इन-शॉप काऊंटर सुरु करून आम्ही प्रत्येक पिढीला साजेसा खरेदी अनुभव देत आहोत.

लाइटस्टाईल शॉप-इन-शॉपमुळे तरुणाईला आधुनिकतेसोबतच आपली परंपरा जपता येणार आहे. लाइटस्टाईल आपल्या परंपरेला आधुनिकतेची झळाळी देत, ग्राहकांना परंपरा आणि ट्रेंडचा मिलाफ असलेला ताजा, समावेशक आणि स्टायलिश अनुभव देईल.

## लवकर निदान आणि वेळेत उपचारामुळे सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल सावंगी (मेघे) मध्ये दुर्मिळ कॅन्सरवर मात



**चंद्रपूर, २४ सप्टेंबर :** कॅन्सरच्या उपचारांमध्ये लवकर निदानाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या एका उल्लेखनीय प्रकरणात, सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल सावंगी (मेघे) येथे मल्टिपल मायेलोमा या दुर्मिळ आणि गुंतागुंतीच्या रक्ताच्या कॅन्सरवर ७२ वर्षीय महिलेला यशस्वीरित्या उपचार मिळाले.

रुग्णाला सलग तीन महिने तीव्र वेदना आणि तोंडात वाढणारा गाठयुक्त गाठवट जाणवत होता. ऑगस्ट २०२५ मध्ये तिला सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल सावंगी (मेघे) येथे दाखल करण्यात आले. प्रारंभीच्या बायोप्सी आणि इम्युनो हिस्टो केमिस्ट्री तपासणीत प्लाझ्मासायटोमा दर्शविणारे घातक प्लाझ्मा सेल डिपॉझिट्स आढळले. त्यानंतरच्या सीटी स्कॅनमध्ये मणक्याच्या हाडांमध्ये अनेक गाठी असल्याचे दिसून आले. बोन मॅरो बायोप्सी, एस्पिरेशन आणि सीरम क्वांटिटेटिव्ह इम्युनोफिक्सेशन इलेक्ट्रोफोरेसिस तपासण्या केल्यानंतर मल्टिपल मायेलोमा असल्याचे निश्चित झाले.

डॉ. प्रज्ञा मोडक (फुल-टाईम कन्सल्टंट मेडिकल ऑन्कोलॉजी) आणि समर्पित मेडिकल ऑंकोलॉजी टीममधील डॉ. अमन सोंडौले आणि डॉ. राहुल अरोरा यांच्या यांच्या तज्ज्ञ देखरेखीखाली रुग्णावर त्वरित व्हीटीडी रेजिमेन बोर्टेझोमिब, थॅलिडोमाइड आणि डेक्सामेथासोन या लक्ष्यित उपचारपद्धतीवर सुरू करण्यात आली. परिणाम अतिशय उल्लेखनीय होते केवळ चार आठवड्यांत तोंडातील गाठ पूर्णपणे गायब झाली आणि पाठीचे दुखणे पण खूप कमी झाले.

या प्रकरणाबद्दल बोलताना डॉ. प्रज्ञा मोडक म्हणाल्या हे प्रकरण लवकर निदान व पुराव्यावर आधारित, लक्ष्यित उपचारांचे सामर्थ्य अधोरेखित करते. मल्टिपल मायेलोमा सारख्या दुर्मिळ व आक्रमक कॅन्सरमध्येही वेळेत निदान आणि संपूर्ण उपचारामुळे परिणाम पूर्णपणे बदलू शकतात.

हे प्रकरण सर्वांना एक महत्त्वाची आठवण करून देते की, नियमित आरोग्य तपासण्या, न सुटणाऱ्या लक्षणांसाठी त्वरित वैद्यकीय सल्ला आणि वेळेवर उपचार हे जीव वाचवू शकतात. अत्याधुनिक तपासण्या आणि प्रगत उपचार पद्धतींसह एसजीएमसीएच सर्वंकष कॅन्सर केअरमध्ये नवे मानदंड प्रस्थापित करत आहे जेथे आशा ही फक्त शक्यता नसून वास्तव बनते.

## एसबीआय कार्डतर्फे खुशियां अनलिमिटेड कॅम्पेन

**नागपूर, २४ सप्टेंबर :** भारतातील सर्वात मोठे प्योर-प्ले क्रेडिट कार्ड जारी करणाऱ्या एसबीआय कार्डने 'खुशीयां अनलिमिटेड' कॅम्पेनसह २०२५ च्या सणासुदी दरम्यान देशभरात रोमांचक ऑफर्सची विस्तृत मालिका सुरू केली आहे. टियर २ आणि टियर ३ सह २९०० हून अधिक शहरांमध्ये ऑनलाइन आणि ऑफलाइन प्लॅटफॉर्मवर सुमारे १२५०+ व्यापारी-अनुदानीत ऑफर, कॅशबॅक आणि त्वरित सवलतीच्या ऑफरचा ग्राहक लाभ घेऊ शकणार आहेत. सणासुदीच्या सवलती ग्राहक टिकाऊ वस्तू, मोबाईल, लॅपटॉप, फॅशन, फर्निचर, दागिने, ई-कॉमर्स आणि किराणा यासह सर्व प्रमुख श्रेणींवर लागू आहेत. कार्डधारक अधिक सोयीस्कर आणि लवचिकतेसह उच्च-मूल्य खरेदी करू शकतील हे सुनिश्चित करण्यासाठी, एसबीआय कार्डने अनेक प्रतिष्ठित भागीदार ब्रँडच्या भागीदारीत अनेक ईएमआय-केंद्रित ऑफर देखील सादर केल्या आहेत.

उत्सवी वातावरणात भर घालण्यासाठी, एसबीआय कार्ड ॲमेझॉन, रिलायन्स रिटेल ग्रुप, मॅक्स, रेमंड्स, मॉन्टे कार्लो यासह इतर अनेक आघाडीच्या भागीदार ब्रँडच्या खरेदीवर आकर्षक त्वरित सवलत ऑफर देत आहे. याव्यतिरिक्त, एसबीआय कार्डच्या ईएमआय-केंद्रित ऑफर २७.५% पर्यंत त्वरित सवलतीसह ग्राहकोपयोगी वस्तू, मोबाइल आणि लॅपटॉपसह लोकप्रिय श्रेणींवर उपलब्ध आहेत. या सणासुदीच्या ऑफर उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रमुख ब्रँडमध्ये सॅमसंग, हायर, एलजी, सोनी, ओप्पो, विवो, पॅनासोनिक, व्हर्लपूल, बॉश, आयएफबी, एचपी आणि लॉयड यांचा समावेश आहे.

## सॅमसंग बीस्पोक एआय अप्लायन्सेसवर अभूतपूर्व डिल्स, कॅशबॅक आणि रिवॉर्ड्ससह घेऊन येत आहे बिग बीस्पोक एआय फेस्टिवल'



**मुंबई, २४ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांचे सर्वात मोठे उत्सवी साजरीकरण द बिग बीस्पोक एआय फेस्टिवल'ची घोषणा केली, जेथे ग्राहकांना बीस्पोक एआय डिजिटल अप्लायन्सेसवर आकर्षक डिल्स व रिवॉर्ड्सचा आनंद घेता येईल. २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत वैध असलेली ही मोहिम ग्राहकांना सॅमसंगच्या बीस्पोक एआय श्रेणीवर विशेष ऑफर्स, कॅशबॅक व उत्सवी रिवॉर्ड्सच्या माध्यमातून आधुनिक एआय-समर्थित इनोव्हेशन्ससह त्यांच्या घरांना अपग्रेड करण्यास मदत करेल. या मोहिमेसह सॅमसंग यंदा सणासुदीच्या काळात भारतातील ग्राहकांसाठी कनेक्टेड, सर्वोत्तम व ऊर्जा-कार्यक्षम तंत्रज्ञान अधिक सहजसाध्य करत आहे.

बिग बीस्पोक एआय फेस्टिवल'दरम्यान ग्राहक निवडक बीस्पोक एआय अप्लायन्सेसवर जवळपास ५०,००० रूपयांची कॅशबॅक आणि विविध मॉडेल्सवर जवळपास ४७ टक्के सूटचा आनंद घेऊ शकतात. या ऑफर्स रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, मायक्रोवेव्ह्ज व एअर कंडिशनर्सवर आहेत, ज्यामुळे सॅमसंगच्या आधुनिक नाविन्यतांमध्ये अपग्रेड होण्याची ही परिपूर्ण वेळ आहे. अपग्रेडला अधिक विनासायास करण्यासाठी सॅमसंग त्यांच्या २०/५ फायनान्स योजनेअंतर्गत निवडक रेफ्रिजरेटर्स व वॉशिंग मशिन्सवर विशेष १ ईएमआय ऑफ' फायद्यासोबत झीरो डाऊन पेमेंटसह स्थिर फायनान्स पर्याय देखील देत आहे. या योजनेअंतर्गत सॅमसंग पहिल्या ईएमआयचे पेमेंट करेल, तसेच ग्राहक खरेदीच्या वेळी ५ महिन्यांसाठी ईएमआय आधीच भरू शकतात. उर्वरित रक्कम २० महिन्यांमध्ये नो-कॉस्ट ईएमआय म्हणून आकारण्यात येईल.

द बिग बीस्पोक एआय फेस्टिवल'सह आम्ही भारतातील कुटुंबांसाठी सॅमसंगचे सर्वात प्रगत, ग्राहक-केंद्रित नाविन्यता आणत आहोत. बीस्पोक एआय श्रेणी अधिक सोयीसुविधा देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, जी दैनंदिन जीवन सोपे करते, तसेच श्रेणींमध्ये वैयक्तिकृत, ऊर्जा-कार्यक्षम अनुभव देते. ही ग्राहकांसोबत सणासुदीचा काळ साजरे करण्याची सॅमसंगची पद्धत आहे, ज्यामुळे विशेष ऑफर्स, कॅशबॅक आणि विस्तारित वॉरंटीच्या माध्यमातून कनेक्टेड व सर्वोत्तम तंत्रज्ञान अधिक सहजसाध्य होत आहे. या मोहिमेमधून नाविन्यतेप्रती आमची कटिबद्धता दिसून येते आणि भारतातील ग्राहकांच्या सर्वसमावेशक जीवनशैलींशी पूरक आहे," असे सॅमसंग इंडियाच्या डिजिटल अप्लायन्सेसचे उपाध्यक्ष गुफरान आलम म्हणाले.

## यामध्ये स्त्री-पुरुष बदल नाही तर कला महत्त्वाची आहे : आसिफ शेख

**मुंबई, २४ सप्टेंबर :** भारतीय टेलिव्हिजनवरील सर्वात प्रतिभावान कलाकारांपैकी एक आसिफ शेख यांनी त्यांच्या प्रभावी अभिनयासह लाखो प्रेक्षकांचे मन जिंकले आहे. एण्डटीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है' मध्ये विभुती नारायण मिश्राची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय असलेल्या त्यांनी त्यांची अनुकूलता आणि मोहकतेच्या माध्यमातून स्वत:चा दर्जा स्थापित केला आहे. अनेक वर्षांपासून त्यांनी हून अधिक भूमिका साकारल्या आहेत, पडद्यावर विविधता सादर केली आहे. रोचक बाब म्हणजे यापैकी अनेक महिला पात्रांच्या भूमिका देखील आहेत आणि या भूमिका साकारण्याचे आव्हान अनेक कलाकार नाकारू शकतात. पण आसिफ शेखने यांनी लैंगिक बदलावर नाही तर कलेवर नेहमी लक्ष केंद्रित केले आहे. त्यांनी नुकतेच त्यांचा अनुभव, तयारी आणि अशा भूमिका पडद्यावर सादर करण्यासाठी घ्यावी लागणारी मेहनत याबाबत सांगितले. आपल्या भूमिकांबाबत सांगताना आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा म्हणाले, "मालिका 'भाबीजी घर पर है' सुरू झाली तेव्हा माझ्या भूमिकांसंदर्भात अनेक संशोधन व विकास करण्यात आले. हळूहळू, टीमने माझ्यासाठी विविध पात्र व लुक्सची रचना करायला सुरूवात केली आणि प्रेक्षकांनी भरपूर प्रेमाचा वर्षाव करत प्रतिसाद दिला. मी माझे दिग्दर्शक व लेखकांचे आभार व्यक्त करतो, ज्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला आणि मला या संधी दिल्या. आतापर्यंत, मी हून अधिक भूमिका साकारल्या आहेत आणि त्यापैकी हून अधिक भूमिका ते वर्ष वयोगटातील महिलांच्या आहेत.

## आयडीबीआय बँके तर्फे त्यांच्या ३१० शाखांमध्ये रिटेल लोन उत्सवाची सुरुवात

**मुंबई, २४ सप्टेंबर :** येत्या सणासूदीच्या दिवसांचा आनंद वृध्दिंगत करण्याच्या उद्देशाने आयडीबीआय बँके तर्फे विशेष रिटेल लोन उत्सव चे आयोजन २२ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२५ दरम्यान केले आहे. बँकेच्या बँक ऐसा दोस्त जैसा उपक्रमाचे तत्वज्ञान समोर ठेऊन बँकेच्या ग्राहकाभिमुख दृष्टिकोनानुसार गृहकर्ज, ऑटोलोन, शैक्षणिक कर्जे, मालमत्ते वरील कर्जे आणि खाजगी कर्जे यांवर विशेष सवलती या काळात देण्यात येणार आहेत.

रिटेल लोन उत्सव चे डिझाईन हे भारतीय ग्राहकांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन करण्यात आले आहे कारण या सणासूदीच्या दिवसात ग्राहक हे महत्त्वपूर्ण असे जीवनशैली आणि अर्थकारणाशी निगडीत निर्णय घेत असतात.

बँके तर्फे या रिटेल लोन उत्सवासाठी संपूर्ण भारतातील २९ राज्यांमधील १५६ जिल्ह्यांमधील ३१० विविध शाखांची निवड केली आहे.

यावेळी बोलतांना आयडीबीआय बँकेचे डीएमडी श्री सुमित फक्का यांनी सांगितले दि रिटेल लोन उत्सव हा या सणासूदीच्या दिवसांत ग्राहकांशी असलेले संबंध अधिक दृढ करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. ग्राहकांसाठी विशेष कर्जांची वैशिष्ट्ये , आकर्षक नियम आणि अजोड प्रक्रिया यांमुळे आम्ही ग्राहकांना आनंददायी आणि आकर्षक अनुभव देऊन नवीन सुरुवातीचा आनंद देऊ करत आहोत.

## यंदाच्या दिवाळीत शाओमीकडून मोठी ऑफर : स्मार्टफोन, टीव्ही, टॅबलेट व अन्य उत्पादनांवर जबरदस्त सवलत



**बंगळुरू, २४ सप्टेंबर :** या दिवाळीत तुमचे घर आणि सण उजळून टाकण्यासाठी तयार व्हा. कारण जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी शाओमी इंडिया आपल्या सर्वांत मोठ्या मोहिमेसह उत्सवाची सुरुवात करत आहे. या अंतर्गत स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही, टॅबलेट, वेअरेबल्स, पॉवरबँक, एअर प्युरिफायर इत्यादी अनेक उत्पादनांवर जबरदस्त ऑफर्स उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. कुटुंब एकत्र येत असताना आणि आनंदोत्सव साजरा करताना, शाओमी अत्याधुनिक नवकल्पना आणि आकर्षक किंमतींच्या माध्यमातून या सणाला आणखी उजाळा देत आहे. ६० % पर्यंत बचतीची ही सुवर्णसंधी अपग्रेड, गिफ्टिंग आणि स्मार्ट लाईफस्टाईल घरी आणण्यासाठी परिपूर्ण आहे. ही विक्री २२ सप्टेंबर २०२५ पासून mi.com, Amazon, Flipkart आणि शाओमीच्या देशभरातील रिटेल पार्टनर्स यांच्यामार्फत मर्यादित कालावधीसाठी सुरू होणार आहे.

प्रत्येकासाठी स्मार्टफोन ऑफर्स

सणाच्या उत्सवात आठवणी कैद करणं, कनेक्ट राहणं आणि मोबाईलवर जास्तीतजास्त काम करणं यासाठी स्मार्टफोन महत्त्वाचा घटक असतो. या दिवाळीत शाओमी आणि रेडमीकडून स्टायलिश आणि दमदार स्मार्टफोन आकर्षक किमतीत उपलब्ध होत आहेत.

रेडमी नोट १४ प्रो+ ५ जी : प्रगत २०० एमपी एआय कॅमेऱ्यासह, प्रत्येक दिवाळी फोटो सुंदर बनवतो. मग ते चमकणारे दिवे असोत किंवा कुटुंबासोबतचे पोर्ट्रेट्स.

रेडमी १५: प्रचंड ७००० mAh बॅटरीसह, दिवसभर वापरासाठी परिपूर्ण. विशेषतः प्रवास करणाऱ्यांसाठी.

रेडमी १४ सी ५जी: आकर्षक डिझाइन व विश्वासार्ह परफॉर्मन्ससह, तरुण प्रोफेशनल्स व विद्यार्थ्यांसाठी उत्तम पहिला ५ जी स्मार्टफोन.

रेडमी ए४ ५जी: पुढील पिढीची ५जी कनेक्टिव्हिटी सर्वांच्या हाती आणतो, ज्यामुळे कनेक्ट राहणं सोपं होतं.

## एचसीजी कॅन्सर सेंटर नागपूरने इंटरनॅशनल पेशंट सेफ्टी वीकमध्ये ज्ञानवर्धक उपक्रम राबवले

**नागपूर, २४ सप्टेंबर :** एचसीजी कॅन्सर सेंटर नागपूरने इंटरनॅशनल पेशंट सेफ्टी वीक यशस्वीपणे साजरा केला. या निमित्ताने रुग्ण सुरक्षा विषयक जागरूकता आणि पद्धती बळकट करण्यासाठी विविध इंटरॲक्टिव्ह व ज्ञानवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात नर्सिंग टीम व विविध विभागातील केअरगिव्हर्स यांनी उत्साहाने सहभाग घेतला, ज्यातून रुग्णांना सुरक्षित, संवेदनशील आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्याबाबत रुग्णालयाची बांधिलकी स्पष्ट झाली.

संपूर्ण आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक ज्ञान व प्रत्यक्ष कौशल्य वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यात सेफ्टी ड्रिल्स, इंटरॲक्टिव्ह कार्यशाळा, पोस्टर प्रेझेंटेशन्स व ज्ञानसत्रांचा समावेश होता. यामध्ये सुरक्षित क्लिनिकल प्रॅक्टिसेस, प्रभावी संवाद, संसर्ग नियंत्रण व रुग्ण-केंद्रित काळजी यावर विशेष भर देण्यात आला.

या प्रसंगी एचसीजी कॅन्सर सेंटर नागपूरच्या सीओओ, सौ. नीता राजवार म्हणाल्या, पेशंट सेफ्टी ही केवळ प्रोटोकॉल नसून एक संस्कृती आहे, जी आम्ही एचसीजी कॅन्सर सेंटर नागपूरमध्ये दररोज जोपासण्याचा प्रयत्न करतो. इंटरनॅशनल पेशंट सेफ्टी वीक साजरा केल्याने आपली सामूहिक जबाबदारी अधोरेखित होते की प्रत्येक रुग्णाला सुरक्षित व सर्वोत्तम स्तराची काळजी मिळावी. आमच्या नर्सिंग टीम व केअरगिव्हर्सनी दाखवलेले समर्पण व उत्साह याचा मला अभिमान आहे तेच आमच्या गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेचे खरे आधार आहेत.




या वर्षी इंटरनॅशनल पेशंट सेफ्टी वीकचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण टीमला वर्षभर रुग्णसेवा व रुग्णसुरक्षेसाठी प्रेरित ठेवणे, जेणेकरून या उपक्रमातून मिळालेली शिकवण सातत्याने वापरात राहील आणि दैनंदिन कामकाजात रुजेल. नर्सिंग स्टाफ व केअरगिव्हर्सनी मनापासून सहभाग घेतला आणि टीमवर्क, समर्पण तसेच रुग्णकल्याणाबद्दलची खोल जबाबदारी दाखवून दिली. या आठवड्यातील उपक्रमांनी व्यावहारिक ज्ञान दिले आणि प्रत्येक स्तरावर पेशंट सेफ्टी कायम ठेवण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले.

इंटरनॅशनल पेशंट सेफ्टी वीकचा हा उत्सव एचसीजी कॅन्सर सेंटर नागपूरच्या डिंग लाइफ टू इयर्स या ब्रीदवाक्याशी सुसंगत असून सुरक्षा, सहानुभूती आणि विश्वास यांची सातत्यपूर्ण संस्कृती प्रोत्साहित करतो.

## सॅमसंगकडून भारतात गॅलेक्सी वीअरेबल्सच्या श्रेणीवर आकर्षक उत्सवी डिल्सची घोषणा



**मुंबई, २४ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांच्या नवीन गॅलेक्सी वीअरेबल्ससोबत नुकतेच लाँच केलेली गॅलेक्सी वॉच८ सिरीज आणि गॅलेक्सी बड्स३ एफईवर अभूतपूर्व किमतींची घोषणा केली. सणासुदीच्या काळापूर्वी गॅलेक्सी वॉच अल्ट्रा आणि गॅलेक्सी रिंग या इतर काही उत्पादनांवर मोठ्या सूट मिळणार आहेत. या विशेष सूट ग्राहकांना गॅलेक्सी वीअरेबल्स लाँच झाल्यापासून सर्वात आकर्षक किमतींमध्ये खरेदी करण्याची उत्तम संधी देतात.

आजपासून गॅलेक्सी वॉच८ सिरीज जवळपास १५,००० रूपयांच्या मोठ्या सूटसह उपलब्ध असेल, तर नुकतेच लाँच करण्यात आलेले गॅलेक्सी बड्स३ एफई ४,००० रूपयांच्या सूटसह उपलब्ध असेल. गॅलेक्सी वॉच अल्ट्रा १८,००० रूपयांच्या सूटसह उपलब्ध असेल आणि गॅलेक्सी रिंग १५,००० रूपयांच्या सूटसह उपलब्ध असेल; त्वरित कॅशबॅक किंवा अपग्रेड बोनसच्या माध्यमातून या विशेष किमतींचा आनंद घेता येऊ शकतो, जे मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध आहेत. याव्यतिरिक्त, अधिक किफायतशीरपणाचा शोध घेत असलेले ग्राहक जवळपास १८ महिन्यांसाठी नो-कॉस्ट ईएमआयचा फायदा घेऊ शकतात.

## आज का अंदाज

गुरूवार २५ सप्टेंबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४ | ५ | ८ | ३ | ६ | ७ | ९ |
| २४६ | ११२ | १२२ | २६० | ५८० | १५० | २७८ | २६९ |
| १५६ | ४०० | २५८ | ४६८ | ३५५ | ३५८ | ३५९ | ४५८ |
| ३४५ | ६८० | ३७५ | ३६९ | ६७० | २८६ | ४५८ | ३६८ |
| २१ | ४१ | ५१ | ८१ | ३४ | ६४ | ७४ | ९३ |
| २३ | ४३ | ५३ | ८४ | ३६ | ६७ | ७६ | ९६ |
| २८ | ४८ | ५८ | ८७ | ३९ | ६९ | ७९ | ९८ |

**२५ सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ५४ | ६४ |
| २० | ३० | ५६ | ६५ |
| २६ | ३६ | ५८ | ६९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान लोकसहभागातून स्वावलंबी राष्ट्र उभारणीचा संकल्प करूया : रविंद्र चव्हाण

**मुंबई, २४ सप्टेंबर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली 'आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान' देशभर सुरू होत आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती (२५ सप्टेंबर) ते भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती (२५ डिसेंबर) या काळात हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा उद्देश प्रत्येक भारतीयाला स्वदेशी संकल्पाशी जोडणे, लोकसहभागातून राष्ट्रनिर्मितीला गती देणे आणि 'वोकल फॉर लोकल' चा संदेश घराघरात पोहोचवणे असल्याचे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष आणि डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण यांनी डोंबिवलीत केले. 'नमो रमो' या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या गरबा कार्यक्रमस्थळी घर घर स्वदेशी हा संदेश देणाऱ्या महाकाय आकाश फुग्याचे अनावरण या वेळी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.




आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान अंतर्गत राष्ट्रीय, राज्य, जिल्हा आणि मंडल पातळीवर कार्यशाळा, महिला व युवा संमेलन, व्यापारी व उद्योग परिषद, स्वदेशी मेळावे तसेच 'आत्मनिर्भर भारत संकल्प रथ' यांसारखे विविध कार्यक्रम देशभर होणार आहेत. शेतकरी, महिला, युवक, कारागीर, छोटे दुकानदार, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक क्षेत्र तसेच व्यापारी व उद्योग क्षेत्र यामध्ये सक्रिय सहभाग होणार असून 'घर घर स्वदेशी' या भावनेतून स्वदेशी उत्पादनांचा प्रसार, लघुउद्योगांना प्रोत्साहन आणि स्थानिक उद्योजकांना आधार देणे हा अभियानाचा मुख्य उद्देश राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.

समस्त महाराष्ट्रवासियांना नवरात्रीच्या शुभेच्छा देताना डोंबिवलीतील 'नमो रमो नवरात्रीच्या' निमित्ताने गेली ८ वर्षे स्थानिक कारागीर, उत्पादक, महिला बचतगट आणि व्यावसायिकांना अगोदरपासूनच पाठबळ देत असल्याचे चव्हाण यांनी आवर्जून सांगितले. या प्रसंगी भाजपा कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, भाजपा महाराष्ट्र प्रदेश अनुसूचित जाती मोर्चा सरचिटणीस शशिकांत कांबळे, मंडल अध्यक्ष मितेश पेणकर, करण जाधव, धनाजी पाटील, सौ. प्रिया जोशी, शक्तिवान भोईर, रितेश फडके, पवन पाटील, लक्ष्मण पंत, परेश तेलंगे, विश्वजीत करंजुले, नितेश म्हात्रे, स्वप्निल काटे, समीर भंडारे, नवनाथ पाटील, माजी नगरसेवक मुकुंद (विशू) पेडणेकर तसेच सर्व पदाधिकारी आणि भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

## राशीभविष्य

**मेष :** आज, तुमच्या सकारात्मक विचारांना अर्थपूर्ण प्रयत्नांमध्ये वळवा. मुले सोशल मीडियाद्वारे नाचायला शिकू शकतात. तुम्ही घरातील अपूर्ण कामे देखील पूर्ण करू शकता ; यासाठी तुमच्याकडे भरपूर वेळ असेल.

**वृषभ :** आज तुम्हाला तुमच्या करिअरबद्दल काही चांगली बातमी मिळेल. तुमच्या वडिलांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका, कारण हे भविष्यात तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मिथुन :** आज तुम्हाला भावनिक अशांततेचा सामना करावा लागू शकतो. कौटुंबिक बाबींबद्दल शांतपणे विचार करण्याची गरज आहे; तुमच्या चांगल्या कामांसाठी तुम्हाला समाजात मान्यता मिळेल.

**कर्क :** आज तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत असेल. तुमचे वडीलही तुमच्या व्यवसायात तुम्हाला साथ देतील. कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी तुम्हाला वडीलधाजयांकडून सहकार्य मिळेल.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. तुम्ही पूर्वी केलेली छोटी छोटी कामे देखील सकारात्मक परिणाम देतील. शिवाय, यश, जरी लहान असले तरी, ते कायम राहील.

**कन्या :** तुमच्या जवळच्या व्यक्तीकडून तुम्हाला काही सल्ला मिळू शकतो जो खूप फायदेशीर ठरेल. तुमच्या आईला आज तिच्या मुलांसाठी काहीतरी गोड पदार्थ बनवावासा वाटेल.

**तुळ :** आज नशीब तुम्हाला साथ देईल. आज तुम्ही तुमच्या व्यवसायाला पुढे नेण्यासाठी काही योजना आखाल, ज्यामुळे तुम्हाला फायदाच होईल. तुम्ही मित्रांशी फोनवर बोलण्यात वेळ घालवाल.

**वृश्चिक :** आज ऑफिसची कामे पूर्ण करताना तुमचे लक्ष केंद्रित ठेवा. या राशीच्या प्रॉपर्टी डीलर्सचे काम चांगले होईल आणि तुमचे अडकलेले पैसे तुम्हाला परत मिळतील.

**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. तुमच्या सोबतीच्या व्यक्तीला पूर्णपणे समजून घेतल्यानंतर आणि ओळखूनच मित्र बनवण्याची काळजी घ्या.

**मकर :** सौंदर्यप्रसाधनांच्या व्यवसायात असलेल्यांना आज मोठा नफा होईल. तुम्ही तुमच्या वडिलांकडून काहीतरी नवीन शिकाल. तुम्हाला एखादी जुनी वस्तू सापडेल जी तुम्हाला आनंदी करेल.

**कुंभ :** तरुणांना आज चांगल्या नोकऱ्या मिळण्याची शक्यता आहे. त्यांना व्यवसायात प्रगतीच्या संधी देखील मिळतील. फर्निचर व्यवसायात आहेत त्यांना अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी आनंद घेऊन येईल. व्यवसायात तुम्हाला लक्षणीय यश मिळू शकेल. तुम्ही काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार देखील करू शकता .सुरुवात करण्यापूर्वी वडिलांचा सल्ला घ्या.




# फॅशन आयकॉन अनन्या पांडे

अभिनेता चंकी पांडे यांची मुलगी अनन्या, ही बॉलिवूडमधील एक लोकप्रिय अभिनेत्री आहे. २०१९ मध्ये ''स्टुडंट ऑफ द इयर २ '' या चित्रपटातून ती प्रथम प्रेक्षकांसमोर आली. त्यानंतर तिने ''पति पत्नी और वो'', ''खाली पीली'', ''लाइगर'', ''ड्रीम गर्ल २'' यांसार'या चित्रपटांत विविध भूमिका केल्या. तिची अभिनयशैली तरुणाईला जवळची वाटते आणि तिच्या फॅशनसाठी ती नेहमी चर्चेत असते. वडीलांच्या पावलावर पाऊल टाकत अभिनय क्षेत्रात आलेल्या अनन्याला लहानपणापासूनच अभिनयाची आवड आहे. आपल्या वडीलांप्रमाणे आपण देखील एक प्रसिद्ध अभिनेत्रीच व्हायचे हे तिने अगदी बालपणीच ठरवले होते. लवकरच अनन्या पांडे धर्मा प्रॉडक्शनच्या एका महत्त्वाच्या चित्रपटात झळकणार आहे. तिचा स्क्रीन-प्रेझेन्स आणि नैसर्गिक अभिनय यामुळे धर्मा प्रॉडक्शनचा चांद मेरा दिल चित्रपट तरुणांना नक्की आवडेल. या बरोबरच २०२६ च्या पहिल्या तिमाहीत येऊ घातलेल्या आयएमडीबी प्रॉडक्शनचा, समीर विदवांस दिग्दर्शित तू मेरी मै तेरा, मै तेरा तू मेरी हा कार्तिक आर्यनबरोबर चित्रपट करण्यात ती सध्या बिझी आहे.




# लव इन विएतनाम गर्ल अवनीत

टीव्ही विश्वातील अभिनेत्री अवनीत कौर सध्या विशेष चर्चेत आली आहे. भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहली याने तिच्या फॅनपेजवरील एक फोटो लाइक केल्याचे समोर आले. त्यानंतर विराटने याविषयी स्पष्टीकरण देणारी पोस्टही शेअर केली. त्यामुळे अवनीत कौर प्रसिद्धीच्या झोतात आली. २०१० मध्ये 'डान्स इंडिया डान्स लिटिल मास्टर्स या शोमधून तिने आपल्या करिअरची सुरुवात केली. २०१२ मध्ये 'मेरी मां या मालिकेत तिने पहिल्यांदा काम केले. त्यानंतर तिने अनेक मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केले. २०२३ मध्ये ती नवाजुद्दीन सिद्दीकीसोबत 'टिकू वेड्स शेरू या चित्रपटात दिसली. त्यानंतर 'लव की अरेंज मॅरिज या चित्रपटात काम केले होते. 'अलादीन - नाम तो सुना होगा, सावित्री एक प्रेम कहानी' आणि 'एक मुट्ठी आसमान या मालिकांमुळे तिला खूप लोकप्रियता मिळाली. तिने शांतनु माहेश्वरीसोबत 'लव इन व्हिएतनाम नावाचा चित्रपट देखील केला आहे. या चित्रपटात अवनीत आणि शांतनुची केमिस्ट्री लोकांना खूप आवडली आहे.



# सीक्वेल 'साडे माडे तीन'चा...

झी टॉकिज स्टुडिओचा पहिला मराठी चित्रपट म्हणजे 'साडे माडे तीन'. या चित्रपटाने त्यावेळी बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. हास्य, विनोद, भावनिक सीन्स अशा सर्व गोष्टींनी भरलेला हा चित्रपट सुपरहिट झालेला. आजही केव्हा टीव्हीवर हा चित्रपट लागला तर तो आवर्जून पाहिला जातो. हा चित्रपट २००७ मध्ये प्रदर्शित झाला होता. अंकूश चौधरी आणि सचित पाटील यांनी अभिनेत्यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. भरत जाधव, मकरंद अनासपुरे व अशोक सराफ ही कुरळे ब'दर्सची तिकडी सगळ्यांनाच भावली होती. अशातच १७ वर्षांपूर्वी रुपेरी पडद्यावर कमाल दाखवणारी ही त्रयी आता पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'साडे माडे तीन' या चित्रपटाचा दुसरा भाग येणार हे आता नक्की झाले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अंकुश चौधरी करणार आहे. येत्या सप्टेंबरपासून 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शुभारंभ होणार आहे.




# प्रेक्षकांच्या भेटीला दोन अफलातून सिनेमे

लव इन व्हिएतनाम आणि जुगनुमा हे दोन चित्रपट बॉक्सऑफिसवर आपली कमाल दाखवण्यासाठी तयार झाले आहेत. येत्या शुक्रवारी १२ सप्टेंबरला हे चित्रपट प्रेक्षागृहात दाखल होतील.

शांतनू माहेश्वरी आणि अवनीतकौर यांचा लव इन व्हिएतनाम म्हणजे एक अनोखी प्रेमकहाणी आहे. ही प्रेमकहाणी पंजाब मध्ये सुरू होते आणि व्हिएतनामला जाऊन पोचते. व्हिएतनामी निसर्गाचं मनोवेधक चित्रण आपल्याला इथे पाहायला मिळणार आहे. व्हिएतनाम आणि भारत यांचा हा सहनिर्मित आहे. या चित्रपटाचे निर्देशक आहेत राहत शाह काजमी. तर कैप्टन राहुल बाली ओमंग कुमार, सर्वेश गोयल, मोहम्मद अंतुले और साहिल शेख यांनी एकत्रपणे या चित्रपटाची निर्मिती केली आहे. फरीदा जलाल, गुलशन ग'वर, राज बब्बर यांच्यासारखे दिग्गज कलाकार या चित्रपटात आहेत. व्हिएतनामी एक्ट्रेस खा नागन या चित्रपटात एका विशेष भूमिकेत आहेत. विशेष म्हणजे चीनमध्ये १०,००० स्क्रीन्सवर रिलीज होणारा हा पहिला भारतीय चित्रपट आहे.

१२ सप्टेंबरला प्रदर्शित होणारा दुसरा चित्रपट आहे 'जुगनूमा'. निर्देशक एम. रेड्डी आणि गुनीत मोंगा कपूर और अनुराग कश्यप निर्मित हा आगळावेगळा चित्रपट प्रेक्षकांना १९८९ च्या दशकात घेऊन जातो. अनेक राष्ट्रीय पुरस्कार और फिल्मफेयर पुरस्कारप्राप्त मनोज वाजपेयी या अभिनेत्याने या चित्रपटात देव या पात्राची भूमिका केली आहे. फळांच्या बागेचा मालक असलेल्या देवच्या बागेतल्या झाडांना विनाकारण आग लागते. या आगीचे रहस्य शोधणारा देव एका रहस्यमय कहाणीत गुरफटत जातो. प्रियंका बोस, दीपक डोबरियाल, तिलोत्तमा शोम, हीरल सिद्धू और अवान पुकोट यांच्या अभिनयाने या चित्रपटाला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. मिथक, रहस्य आणि भावनिक गुंतागुंतीवर आधारित हा एक अविस्मरणीय अनुभव असणार आहे.



# आलिया भट की आलिया कपूर?

आलिया भट नेहमीच चर्चेत असते. आलिया भट्टच्या अभिनय कारकिर्दीला 'हायवे, उडता पंजाब, राजी गंगूबाई काठियावाडी आणि 'रॉकी और रानी की प्रेम कहानी यांसार'या चित्रपटांनी आकार दिला आहे. या सर्व चित्रपटांमध्ये तिने विविध प्रकारच्या आणि आव्हानात्मक भूमिका केल्या आहेत. त्यामुळे ती एक बहुआयामी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. आलिया आजच्या सर्व अभिनेत्रीमध्ये सर्वात बिझी नायिका आहे. मध्यंतरी, मे २०२५ मध्ये कॅन्स फिल्म फेस्टिव्हलला आलिया भट्टने लोरियल अँबेसिडर म्हणून पदार्पण केले होते. त्यावेळी ती ज्या हॉटेलमध्ये राहत होती त्या हॉटेलने तिला ''आलिया कपूर'' म्हणून संबोधले. त्यामुळे ' तिने तिच्या नावात बदल केला का?' असा प्रश्न तिच्या चाहत्यांना पडला. अर्थात अजूनही ती सोशल मीडियावर ''आलिया भट'' म्हणूनच सक्रिय आहे. सध्या आलिया 'लव्ह अँड वॉर या संजय लीला भन्साळी यांच्या चित्रपटात बिझी आहे. त्या चित्रपटात रणबीर कपूर आणि विक्की कौशल देखील असून त्यांच्यातील संघर्षदृश्ये इटलीमध्ये चित्रित केली जात आहेत. चित्रपटाच्या कथानकानुसार, प्रेम आणि युद्धाच्या पार्श्वभूमीवर रणबीर आणि विक्की यांच्यातील संघर्ष चित्रित केला आहे.

# नवे विषय, नवे आशय

येत्या शुक्रवारी म्हणजे १२ सप्टेंबरला आरपार, बिनलग्नाची गोष्ट, आणि दशावतार हे तीन नवे मराठी चित्रपट प्रेक्षागृहात येत आहेत. हे तिन्ही चित्रपट पूर्णपणे वेगवेगळ्या जोनरचे आहेत. त्यामुळे म्हणजे मराठी प्रेक्षकांसाठी ही मनोरंजनाची पर्वणीच आहे.

नात्यांच्या पारंपरिक चौकटींना धक्का देणारा आणि एक नव्या विचारांची झलक देणारा 'बिन लग्नाची गोष्ट हा चित्रपट लिव्ह-इन रिलेशनशिपसार'या संकल्पनेवर आधारित असून, नात्यांची नवीन व्या'या मनोरंजक रीतीने मांडतो. नात्यातील गोडवा, थोडंसं हटके भांडण आणि प्रेम यांची मस्त मिसळ बिनलग्नाची गोष्ट या चित्रपटात अनुभवायला मिळेल. खऱ्या आयुष्यातील जोडी उमेश कामत आणि प्रिया बापट यांच्यासोबत निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांनी एकदम धमाल उडवून दिली आहे. चौघांच्या नात्याचा हा गोड तिखट प्रवास प्रेक्षकांना नक्कीच आवडेल.

अभिनेता ललित प्रभाकर आणि अभिनेत्री हृता दुर्गुळे ही जोडी पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर एकत्र येणार आहे. विशेष म्हणजे ललित आणि हृता यांचा वाढदिवस १२ सप्टेंबरला असतो याच दिवशी त्यांचा हा पहिल्यांदाच एकत्रित काम केलेला आरपार सिनेमा प्रदर्शित होणार आहे. दोन्ही कलाकारांसाठी ही अगदीच आनंदाची बाब आहे. ही जोडी एकत्र खूपच सुंदर दिसत असून त्यांचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना नक्कीच भावणारा आहे. प्रेमात वेड लावायची ताकद असते फक्त पार्टनर चांगला मिळायला हवा हे स्पष्ट करणारा हा चित्रपट पहाण्यासाठी मराठी प्रेक्षक नक्कीच उत्सुक असतील.



महाराष्ट्राची देवभूमी, निसर्गरम्य कोकण आणि तिथल्या लाल मातीत रुजलेली एक भव्य कलाकृती लवकरच मोठ्या पडद्यावर प्रेक्षकांच्या भेटीला येतेय! झी स्टुडिओज् प्रस्तुत आणि ओशन फिल्म कंपनी व ओशन आर्ट हाऊस निर्मित दशावतार ही गूढ आणि थरारक अशी कथा रसिकांसमोर १२ सप्टेंबरला प्रेक्षागृहात उलगडली जाणार आहे. दिलीप प्रभावळकरांचा कसदार अभिनयाने नटलेली ही कलाकृती सुजय हांडे, ओंकार काटे, सुबोध खानोलकर, अशोक हांडे, आदित्य जोशी, नितीन सहस्त्रबुद्धे, मृणाल सहस्त्रबुद्धे, संजय दुबे आणि विनायक जोशी यांनी अधिकच रंगतदार केली आहे.

# नेटफ्लिक्सवर ब्लॉकबस्टर चित्रपट !

या आठवड्यात नेट्फ्लिक्सवर प्रेक्षकांना मनोरंजनाचे एक संपूर्ण पॅकेज मिळणार आहे. बॉक्सऑफिसवर यशस्वी झालेले तीन चित्रपट नेटफ्लिक्सच्या प्रेक्षकांसाठी १२ सप्टेंबरला प्रदर्शित होणार आहेत त्यामुळे तुमचा वीकेंड आणखी खास होऊ शकतो. त्यापैकी एक आहे, 'तन्वी: द ग'ट.' १८ जुलैला थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित आहे. या हृदयस्पर्शी चित्रपटाचे दिग्दर्शन अनुपम खेर यांनी केले आहे आणि त्यात त्यांनी तन्वीच्या आजोबांची भूमिकाही केली आहे. या चित्रपटात शुभांगी दत्त, करण टकर, बोमन इराणी, जॅकी श्रॉफ, अरविंद स्वामी, प'वी जोशी ही तगडी स्टारकास्ट आहे. ऑटिझम असलेल्या तन्वी रैनाची ही कहाणी आहे. या चित्रपटाला ५ पैकी ४ रेटिंग मिळाले आहे.

मोहित सुरी दिग्दर्शित 'सैयारा' या सिनेमाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अनन्या पांडेचा चुलत भाऊ अहान पांडे याने या सिनेमातून बॉलीवूडमध्ये एन्ट्री केली आहे. अहानचा हा पहिलाच चित्रपट असून त्याच्यासह प्रमुख भूमिकेत अभिनेत्री अनीत पड्डा झळकली आहे. अनीतने यापूर्वी 'सलाम वेंकी'मध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. तरुणाईला भावणारी प्रेमकथा, संगीत, इमोशन्स आणि रिलेट करण्यासारखी पात्रे यांचा सुंदर संगम असलेला हा ब्लॉकबस्टर चित्रपट आता १२ सप्टेंबरपासून नेट फ्लिक्सवर पाहता येणार आहे.

१८ जुलैला थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला सोनाक्षी सिन्हाचा 'निकीता रॉय' हा हॉरर थि'लरदेखील १२ सप्टेंबरपासून ओटीटीवर येतो आहे. या चित्रपटात सोनाक्षी सिन्हा, अर्जुन रामपाल, परेश रावल आणि सुहेल नय्यर यांच्यासह अनेक दमदार कलाकार मु'य भूमिकेत आहेत. हा चित्रपट कुश सिन्हा यांनी दिग्दर्शित केला असून हा एक मनोवैज्ञानिक थि'लर आणि मानवी मनातील धूसर क्षेत्रांचा शोध घेणारा एक थंडगार, त'ीन करणारा अनुभव आहे.

हसू, धैर्य, दोस्तीचा सुंदर संगम

ॲमेझोन प्राईम व्हीडीओ वर १२ सप्टेंबर २०२५ ला ही सिरीज स्ट्रीम होणारी 'डू यू वन्ना पार्टनर' ही वेब सिरीज शिखा आणि अनाहिता या दोन जिवलग मैत्रिणींची गोष्ट



सांगते. दोघींनाही स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा असतो. त्या क्राफ्ट बीयरच्या स्टार्टअपची कल्पना पुढे नेतात. पण हा उद्योग पुरुषप्रधान असल्यामुळे गुंतवणूकदार त्यांच्यावर विश्वास ठेवत नाहीत. त्यामुळे त्या एका मेल पार्टनरची कल्पना निर्माण करून त्या स्वतःला टिकवण्याचा प्रयत्न करतात. ह्या प्रवासात हसू, धैर्य, दोस्ती आणि दोघींची धडपड यांचा सुंदर संगम दाखवला आहे. तमन्ना भाटिया हिने शिखाची तर डायना पेंटी हिने अनाहिताची भूमिका साकारली आहे. यांच्याबरोबरच या वेब मालिकेत जावेद जाफरी, नकुल मेहता, श्वेता तिवारी,नीरज कबी, रणविजय सिंह यासारखे जानेमाने कलाकार आहेत. या सिरीजची निर्मिती करण जोहरच्या धर्माटिक बॅनरखाली तयार झाली आहे. अर्चित कुमार आणि कुलीन डीकुन्हा यांचे दिग्दर्शन आहे. शिखा आणि अनाहिता काय कमाल करणार आहेत, ते पाहणे नक्कीच उत्सुकतेचे असेल.

## डॉ. अभय व डॉ. राणी बंग यांना
# गेट्स फाऊंडेशनचा सन्मान



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
बिल गेट्स यांच्या नेतृत्त्वाखाली कार्यरत गेट्स फाऊंडेशनचा सन्मानाचा गोलकिपर्स चँपियन्स हा जागतिक सन्मान सर्च संस्थेचे संस्थापक डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांना मंगळवारी जाहीर झाला.

न्यूयॉर्क येथे झालेल्या समारंभात सर्चच्या वतीने सहसंचालक डॉ. आनंद बंग सहभागी झाले. सर्चसह जगभरातील दहा संस्थांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर स्पेनच्या राष्ट्राध्यक्षांना ग्लोबल गोलकिपर हा पुरस्कार देण्यात आला.

डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांचे सार्वजनिक आरोग्य आणि विशेष करून बालमृत्यू रोखण्यासाठी केलेल्या कल्पक उपाय योजनांची दखल घेत हा सन्मान जाहीर झाला आहे. गेट्स फाऊंडेशन दरवर्षी गोलकिपर्स इव्हेंट हा कार्यक्रम आयोजित करते. २०४५ पर्यंत जगभरातील लाखो बालकांचे जीव वाचवण्याचा संकल्प या गोलकिपर्स इव्हेंटमध्ये बिल गेट्स यांनी जाहीर केला.

बिल गेट्स म्हणाले, २०४५ पर्यंत जगभरातील लाखो बालमृत्यू रोखण्याची आणि त्यासाठी जबाबदार असणाऱ्या काही जीवघेण्या आजारांना नष्ट करण्याची फार मोठी जबाबदारी आहे आणि मानवता एका महत्त्वाच्या वळणावर आहे. ते म्हणाले, आरोग्य सुविधांसाठीच्या निधीत कपात करणे स्वीकारायचे की मुलांना त्यांचा अधिकार असणारे चांगले आयुष्य द्यायचे, यावर आपण पुढील पिढीसाठी काय भवितव्य योजतो ते ठरणार आहे.

२००० मध्ये जगभरात १० लाख बालमृत्यू होत असत, आता हे प्रमाण ५ लाखांवर आले आहे. याला फार मोठे यश मानले जाते. पण आरोग्य सुविधांवरील निधीत कपात झाली तर प्रगतीचे हे चक्र उलट फिरू शकते. लोकांच्या कल्पनेपेक्षा मुलांच्या आरोग्याची आताची स्थिती बिकट आहे. पण आपण विचार करतो, त्यापेक्षा भवितव्य चांगले असणार आहे, असे ते म्हणाले.

डॉ. अभय बंग यांच्या ७५ व्या वाढदिवशी २३ सप्टेंबरला हा जागतिक सन्मान देण्यात आला. सर्च संस्थेने बालकांना न्यूमोनियासाठीचा उपचार आणि नवजात बालकांची काळजी घेण्यासाठी खेड्यातील स्त्रियांना प्रशिक्षत करण्याचे कार्यक्रम सुरू केला. यामुळे अर्भक मृत्यूदर १२१ वरून १६ इतका खाली आणता आला.

भारत सरकारने हाच उपक्रम आशाच्या रूपाने २००५ ला सुरू केला. आता दरवर्षी देशभरातली १० लाखांवर आशा सेविका दीड कोटी नवजात बालकांना आरोग्यसुविधा पुरवतात. डॉ. बंग यांची ही पद्धती ८० देशांत स्वीकारली गेली आहे.

**इतर पुरस्कार**

डेव्हिड बेकहॅम (इंग्लंड) : मुलांचे आरोग्य आणि शिक्षण
क्रिस्टल म्वेसिगा बिरुंगी (युगांडा) : तरुणांचे आरोग्य धोरण
टोनी गार्न (जर्मनी) : मुलींचे शिक्षण आणि आरोग्या
जॉन ग्रीन (अमेरिका) : तरुणांतील टीबी आणि मानसिक आरोग्यावर संवाद
ओसास इघोडारो (नायजेरिया) : मलेरियाविरोधात जनजागृती
डॉ. डोनाल्ड कबेरुका (रवांडा) : जागतिक आरोग्य वित्त
जेरोप लिमो (केनिया) : एचआयव्ही जनजागृती
रीम अल हशिमी (यूएई) : आरोग्य आणि शिक्षण यातील गुंतवणूक

## अतिवृष्टीत सर्वस्व गमावलेल्या शेतकऱ्यांना मोठा धक्का
# कापणीनंतरच्या नुकसानीवरच विम्याची भरपाई

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २४ :**
राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये शेतकरी कुटुंबांनी शेती, गुरं आणि घरदार गमावलं असून या नैसर्गिक संकटामुळे त्यांचे सर्वस्व उद्धवस्त झाले आहे. सरकारी मदतीची आस लावून बसलेल्या शेतकऱ्यांसाठी आता एक मोठा धक्का समोर आला आहे. कारण यंदा शेतकऱ्यांना नुकसानभरपाईसाठी पीकविम्याचे पैसे मिळणार नाहीत.

छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, पीकविम्याच्या नव्या नियमानुसार केवळ कापणीनंतरच्या नुकसानीवरच विम्याची भरपाई मिळेल. त्यामुळे अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले असले तरी विमा कंपनीकडून भरपाई मिळणार नाही. अशा परिस्थितीत आता शेतकऱ्यांना एनडीआरएफच्या निकषांनुसारच मदत मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जुन्या पीकविमा योजनेत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवण्यासाठी पाच प्रमुख घटकांचा आधार दिला जात असे. यामध्ये उगवण न होणे, स्थानिक आपत्ती, मिड अ‍ॅडव्हर्सिटी, कापणीनंतरचे नुकसान (पोस्ट हार्वेस्टिंग) आणि उत्पादन आधारित नुकसान यांचा समावेश होता. तसेच या



योजनेंतर्गत केवळ ३० टक्के नुकसान झाले तरी शेतकऱ्यांना विमा मिळत असे. मात्र, नव्या नियमांनुसार ही मर्यादा वाढवून ५० टक्के करण्यात आली आहे आणि ती केवळ उत्पादनावर आधारित ठेवण्यात आली आहे.

त्यामुळे अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्तीत झालेले नुकसान यामध्ये विचारात घेतले जाणार नाही. परिणामी जुन्या योजनेनुसार शेतकऱ्यांना मिळणारी भरघोस नुकसानभरपाई आता हुकणार आहे.

**पंचनाम्यांच्या आधारे भरपाई**

पीकविम्याच्या नियमांमुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळू शकणार नसली तरी शासनाकडून एनडीआरएफच्या नियमांनुसार मदत दिली जाणार आहे. शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही. शासनाच्या वतीने मदत कार्य सुरु आहे आणि पंचनाम्यांच्या आधारे भरपाई दिली जाईल, असेही सांगण्यात येत आहे.

## प्रेयसीची चाकूने हत्या करून
# प्रियकराने स्वत:लाही संपविले

■ **महासागर प्रतिनिधी**
**बुलढाणा, दि. २४ :**
जिल्ह्यातील खामगाव रक्तरंजित प्रेमप्रकरणाने हादरले. नवरात्र व जगदंबा देवी उत्सवामुळे खामगाव भक्ती रसात न्हावून निघाले असताना व गरब्याची धामधूम सुरु असताना सजनपुरी परिसरात भीषण हत्याकांड घडले. प्रियकराने अगोदर प्रेयसीची निर्घृण हत्या केली आणि नंतर स्वतः आत्महत्या केली.

खामगाव येथे मंगळवार २३ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा हा रक्तरंजित घटनाक्रमाचा थरार रंगला. घटना स्थळ असलेले हॉटिल रक्ताने अक्षरशः माखल्याचे भीषण चित्र होते. तसेच दोघा प्रेमी युगलांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडले होते.

घटनेची माहिती सजनपुरी परिसरासह खामगांव शहरात वेगाने पसरली. यानंतर घटनास्थळ असलेल्या हॉटिल जुगनू कडे पोलिसांसह खामगाव करानी धाव घेतली.

साहिल उर्फ सोनू राजपूत (वय २२), राहणार साखरखेर्डा ता. सिंदखेड राजा, आणि ऋतुजा पद्माकर खरात (रा. शिंदी, ता. सिंदखेड राजा) अशी भीषण अंत झालेल्या प्रेमी व प्रेयसीची नावे आहे.

खामगाव शहरातील सजनपुरी येथील जुगनू हॉटिलमध्ये मंगळवारी रात्री उशिरा हे थरारक हत्याकांड घडले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी सरकारी रुग्णालयात पाठवले आहे. या घटनेने खामगाव हादरले असून, जुगनू हॉटिल पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

दोन्हीही प्रेमीयुगुल साखरखेर्डा परिसरातील रहिवासी असून, खामगाव येथे राहात असल्याचे कळते. सोनू राजपूत व ऋतूजा पद्माकर खरात, हे प्रेमीयुगुल खामगावजवळील सजनपुरी येथील हॉटिल जुगनूमध्ये थांबले होते.

दरम्यान, काही कारणावरून त्या दोघांमध्ये वाद होऊन कडाक्याचे भांडण झाल्याची माहिती आहे. यामध्ये सोनू राजपूत याने ऋतुजाला चाकूने भोसकल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. प्रेयसीची निर्घृण हत्या केल्या नंतर सोनू राजपूत यानेदेखील त्याच चाकूने स्वतःला भोसकून घेत आत्महत्या केली. या दोघांचे दोन वर्षांपासून प्रेमसंबंध असल्याची माहिती असून, या हॉटिलमध्ये ते वारंवार येत असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, सदर घटनेची माहिती पसरताच खामगाव शहरात खळबळ उडाली. होता. घटनास्थळी पोलिस अधीक्षक नीलेश तांबे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक (खामगांव )श्रेणिक लोढा, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील आदींसह पोलिस अधिकाऱ्यांनी भेट देऊन पोलिसांना तपासाच्या सूचना केल्या. मृतदेह ताब्यात घेऊन शासकीय रुग्णालयात रवाना केला होता. घटनेचा तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार करीत आहेत.

## मंत्रालयात आमदारांसाठी स्वतंत्र कार्यालये द्या

**मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४ :**
महाराष्ट्राच्या प्रशासनाच्या हृदयस्थानी आमदारांनी काम करण्यासाठी स्वतंत्र सुविधा मिळावी, अशी मागणी शिवसेना आमदार विलास तरे यांनी केली आहे. ३६६ लोकप्रतिनिधींना मंत्रालयात सतत जनतेच्या प्रश्नांची पाहणी करावी लागते, पण सद्यस्थितीत त्यांना कोणतीही कार्यक्षम कार्यालयीन सोय नाही.

लेखी निवेदनाद्वारे तरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि मंत्रालयाचे मुख्य सचिव राजेश कुमार यांच्याकडे मागणी केली आहे की, मंत्रालयात प्रत्येक आमदारासाठी संगणक, प्रिंटर, इंटरनेट, झेरॉक्स सुविधा तसेच बसण्याची व्यवस्था असलेला स्वतंत्र आमदार कक्ष स्थापन करावा. यामुळे निवेदन तयार करणे, प्रत काढणे आणि मंत्र्यांशी संपर्क साधणे अधिक सोयीस्कर व कार्यक्षम होईल.

आमदार तरे म्हणाले, मंत्रालय हे राज्य प्रशासनाचे सर्वोच्च केंद्र असून, येथे आमदारांना योग्य सुविधा मिळाल्या पाहिजेत. यामुळे जनतेच्या कामांवर जलद आणि प्रभावी निर्णय घेता येईल. ही पायरी लोकशाहीला अधिक बळकट करेल आणि आमदारांच्या कामकाजातील अडथळे दूर करेल.

सध्या आमदारांचे सहाय्यक बाहेरच्या दुकानांवर अवलंबून राहतात; त्यामुळे वेळेवर कागदपत्रे तयार करता येत नाहीत आणि सुरक्षा धोक्यात येते. विलास तरे यांनी स्पष्ट केले की, मंत्रालयात आमदार कक्षाची स्थापना झाल्यास लोकप्रतिनिधींना जनतेची कामे अधिक प्रभावीपणे पार पाडता येतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.

## देशभर सायबर सुरक्षा जनजागृतीचा बिगुल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
देशात डिजिटल व्यवहार झपाट्याने वाढत आहेत, पण त्याच वेगाने वाढत आहेत सायबर गुन्हेही. नागरिकांच्या खिशावर आणि गोपनीयतेवर डोळा ठेवणाऱ्या या गुन्ह्यांविरोधात केंद्र आणि राज्य सरकार सज्ज झाले आहेत. यावेळी मात्र मोहिमेचा पल्ला खूप मोठा आहे.

गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणी बनावट कॉल, फसवे मेसेज, लिंकवर क्लिक करून खात्यातून लाखोंचा गंडा अशा घटना वाढल्या आहेत. सायबर पोलिसांच्या आकडेवारीतही मोठी उडी दिसून येत आहे. त्यामुळे यंदा सरकारकडून केवळ इशारे किंवा पत्रकापुरते न राहता प्रत्यक्ष कृतीतून मोठ्या उपक्रमाला सुरुवात होत आहे.

येत्या २५ सप्टेंबरपासून देशव्यापी सायबर सुरक्षा आणि गोपनीयता जनजागृती अभियान सुरू होणार आहे. बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये होणाऱ्या रिंग द बेल फॉर सिक्युरिटी या विशेष कार्यक्रमातून याची सुरुवात होईल. माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते याचे उद्घाटन होणार असून CERT-In, SEBI, BSE तसेच गृह मंत्रालयाचे वरिष्ठ मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या महिनाभर चालणाऱ्या अभियानात नागरिकांना सायबर सुरक्षिततेच्या सर्वोत्तम पद्धती शिकवल्या जाणार असून, ऑनलाईन सुरक्षित कसे राहायचे याचे थेट मार्गदर्शन होणार आहे.

## भारतामध्ये स्कॅनझायटी कमी करण्यासाठी जाणकारी असेल तर दिलासा मिळेल मोहीम

**लोकसेवार्थ**

भारतातील सिमेन्स हेल्थिनियर्सने जाणकारी असेल तर दिलासा मिळेल ही मोहीम सुरू केली आहे, ज्याचा उद्देश स्कॅनझायटी म्हणजे वैद्यकीय इमेजिंग स्कॅनच्या अगोदर, दरम्यान आणि नंतर रुग्णांना होणारी तीव्र चिंता, भीती किंवा मानसिक ताण कमी करणे हा आहे.

ही मोहीम रुग्णांमध्ये डायग्नॉस्टिक इमेजिंगसंबंधी जागरुकता वाढवणे आणि त्यांच्यातील चिंता कमी करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. यामध्ये मॅमोग्राफी, एमआरआय, सीटी आणि पेट सीटी स्कॅन्ससारख्या डायग्नॉस्टिक प्रक्रियांवर लक्ष केंद्रित केले आहे. ही मोहीम इंग्रजी आणि नऊ प्रादेशिक भाषांमध्ये जसे आसामी, बंगाली, हिंदी, गुजराती, कन्नडा, मराठी, मल्याळम, तमिळ आणि तेलुगू मध्ये निर्मित केलेल्या जागरूकता व्हिडिओंच्या मालिकेद्वारे राबवली जात आहे.

या व्हिडिओंच्या माध्यमातून रुग्णांना आधुनिक इमेजिंगबद्दल चांगली माहिती मिळेल, तसेच नवीन तंत्रज्ञानामुळे स्कॅन्स अधिक सुरक्षित, सोयीस्कर आणि आरामदायी कसे झाले आहेत, हे दाखवले जाईल. सिमेन्स हेल्थकेअर प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक, हरीहरन सुब्रमणियन म्हणाले,

लवकर आणि अचूक निदान केल्यास परिणाम सुधारु शकतात, योग्य वेळी उपचार मिळू शकतात आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांचे प्रभावी व्यवस्थापन करता येते. डॉक्टर्स रुग्ण आणि त्यांची देखभाल करणाऱ्यांच्या अडचणी समजून, त्यांच्या गरजा पूर्ण करू शकतील अशा उपाययोजना देण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न करतो.

या जागरूकता मोहिमेद्वारे प्रत्येक रुग्ण आणि त्याची देखभाल करणाऱ्याला वैद्यकीय सल्ल्यानुसार इमेजिंग प्रक्रियेला आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे ह्यासाठी आवश्यक जाणकारी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आरोग्यसेवा अधिक सुलभ आणि विश्वासार्ह बनवणे हेच आमचे अंतिम उद्दिष्ट आहे.

प्रगत तंत्रज्ञानाद्वारे रुग्णांचा अनुभव कसा सुधारता येईल ह्यावर लक्ष केंद्रित करून, सर्वांसाठी, सर्वत्र आणि शाश्वत आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी ह्यासाठी सिमेन्स हेल्थीनिर्स प्रतिबद्ध आहे.सिमेन्स हेल्थीनिर्सच्या झोन इंडियाचे कम्युनिकेशन्स प्रमुख, प्रणव पाटील यांनी सांगितले की जाणकारी असेल तर दिलासा मिळेल. ह्या मोहिमेद्वारेआम्हाला रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना स्कॅन पूर्वी आणि स्कॅन दरम्यान योग्य माहिती मिळेल आणि त्यांचा आत्मविश्वास वाढेल याची हमी द्यायची आहे.

आजचे डायग्नॉस्टिक इमेजिंग प्रगतच नाही तर पूर्वीच्या तुलनेत रुग्णांसाठी खूप अधिक सुलभ आणि आरामदायीही आहे. अनेक भाषांमध्ये सोपी, संबंधित आणि सहज माहिती उपलब्ध करून देऊन भारतातील विविध समुदायांपर्यंत पोहोचण्याचा हा आमचा प्रयत्न आहे.

ही सर्वसमावेशक मोहिम डिजिटल, ऑफ लाईन, वृत्तपत्र तसेच इतर महत्वाच्या माध्यमांद्वारे एकत्रितपणे राबवण्यात येत आहे.रुग्णांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आरोग्यसेवा आणि तंत्रज्ञान कसे विकसित झाले आहे हे अधोरेखित करण्यासाठी व्हिडिओ सामग्री तयार करण्यात आली आहे. प्रत्येक व्हिडिओ मालिकेत विविध स्कॅन प्रकारांमध्ये तंत्रज्ञान सोप्या, संबंधित आणि समजण्यास सोप्या पद्धतीने समजावले गेले आहे.

■ ■ ■

# युवा शेतकरी बनला बनाना चिप्स उद्योजक






हिंगोली जिल्ह्यातील कुरुंदा, गिरगाव, डोंगरकडा या महसूल मंडलांत केळी क्षेत्र अधिक आहे. वसमत तालुक्यातील केळी पट्ट्यात खाजमापूरवाडी (ता. वसमत) ही वसमत व कळमनुरी तालुक्यांच्या सीमेलगत छोट्या लोकवस्तीची वाडी आहे.

पैनगंगा नदीवरील इसापूर येथील ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या कालव्याचे लाभक्षेत्र आहे. केळी हेच येथील प्रमुख पीक असून, क्षेत्र सुमारे २०० एकरांपर्यंत असावे.गावातील उमेश मुके हे सुमारे २८ वर्षे वयाचे तरुण शेतकरी आहेत. घरची आठ एकर शेती आहे. केळी व हळद ही त्यांची प्रमुख पिके आहेत. केळीच्या बाजारभावांतील अस्थिरता तसेच दर कोसळल्यानंतर होणारे आर्थिक नुकसान या बाबी उमेश सहन करीत होते. त्यातून केळीचे मूल्यवर्धन अर्थात प्रक्रिया करण्याचे त्यांनी ठरविले.

पूर्वीपसून आपण उद्योजक व्हावे त्यांना वाटायचेही. पूर्वी मोबाइल उद्योग, ट्रॅक्टर भाडेतत्त्वावर देणे असे व्यवसाय केले होते. पण त्यात यश आले नव्हते.

२०१८ मध्ये उमेश यांनी आई अन्नपूर्णा यांच्या मदतीने घरच्या केळीपासून घरगुती पद्धतीने चिप्स तयार केले. शेजारील बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या गिरगाव येथील किराणा दुकानाद्वारे त्यांची विक्री केली. चवदार बनाना चिप्सनी ग्राहकांची पसंती मिळवली. मागणी वाढली. उमेश यांचा उत्साह दुणावला.त्यांनी उत्पादन वाढविण्याचा निर्णय घेतला.

दररोज ५ ते १० किलो चिप्स ते बनवू लागले. दुचाकीवरून माल घेऊन जाऊन परिसरातील गावांमध्ये स्वतः विक्री करू लागले. घरगुती पद्धतीने व्यवसाय करताना कच्च्या केळीची साल हाताने काढावी लागे. घरच्या उपलब्ध साधनांच्या साह्याने चकत्या बनविल्या जात. पाच लिटर तेल साठवण क्षमतेच्या छोट्या कढईमध्ये चिप्स तळल्या जायच्या. ड्रमद्वारे चिप्सला मसाला लावण्याची प्रक्रिया व्हायची. जिद्द, उत्पादनाचा चांगला दर्जा व स्वतः मार्केटिंगसाठी घेतलेले कष्ट यातून बाजारपेठेत चिप्स लोकप्रिय होऊ लागले.

काही ठोक व्यापाऱ्यांकडून मग फोनवरून विचारणा सुरू झाली. त्यातून उत्पादनाला अजून उठाव मिळू लागला. आता मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेण्याची तयारी केली.सन २०२० मध्ये विक्रीकर विभागाकडे सिद्ध अन्नपूर्णा फूड्स नावाने उद्योगाची नोंदणी केली. सन २०२१ मध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाकडून परवाना घेतला. तोंडापूर (ता. कळमनुरी) येथील कृषी विज्ञान केंद्राकडून अन्नप्रक्रिया उद्योगाचे प्रशिक्षण घेतले.

मागणी वाढल्यामुळे उत्पादन वाढवणे व त्यासाठी उद्योगाचे आधुनिकीकरण आवश्यक होते. पंतप्रधान सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजने अंतर्गत प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक यंत्रसामग्रीच्या खरेदीसाठी प्रकल्प अहवाल सादर केला. एचडीएफसी बँकेचे १५ लाख रुपये व स्वतःकडील १३ लाख रुपयेअशी २८ लाखांची गुंतवणूक झाली. त्यातून गावखरीच्या स्वतःच्या जागेत ४० बाय ३० फूट आकाराचे शेड उभारले. तेल गरम करण्यासाठी बॉयलर, ह्यलायसर, तेलाचा अंश काढणारे ड्रायर,मसाला मिक्स करणारे तसेच पाऊच पॅकिंग अशी यंत्रे घेतली. त्यातून प्रति दिन एक क्विंटलपर्यंत चिप्सचे उत्पादन घेता येत आहे.

सन २०१८ मध्ये उद्योग सुरू झाला, त्या वेळी वार्षिक दोन ते तीन क्विंटल विक्री होती. सन २०१९ मध्ये त्यात वृद्धी झाली. लॉकडाउनच्या काळात उद्योगावर गदा आली. सन २०२१ च्या जानेवारीपासून पुन्हा उद्योग सुरू झाला. त्यात अलीकडे केलेल्या यांत्रिकीकरणामुळे आणखी चालना मिळाली.आजमितीला महिन्याला ८ ते ९ क्विंटल विक्री होत असून, वर्षभरात १२ टन चिप्स विक्री क्षमता तयार केली आहे. सुरुवातीच्या काळात पाच लाखांच्या आसपास असलेली उलाढाल आज २० लाखांपर्यंत पोहोचली असून, २० टक्के नफा मिळत आहे. शिवाय घरच्या केळींचे मूल्य वाढले आहे.

प्रति क्विंटल केळीपासून २० किलो चिप्स मिळतात.३० ग्रॅम पाऊच पॅकिंग असून १० रुपये त्याची किंमत आहे. याशिवाय १०० ग्रॅम, २०० ग्रॅम व १ किलो असेही पॅकिंग केले आहे. सुरुवातीला परिसरातील गावांमध्ये असलेले मार्केट आता परभणी, नांदेड, छत्रपती संभाजी नगर येथील घाऊक व्यापाऱ्यांपर्यंत विस्तारले आहे. विशिष्ट चव, पॅकिंगमुळे टिकवण क्षमता वाढली आहे .श्रावण महिना, नवरात्र या कालावधीत या चिप्सना मोठी मागणी असते. उद्योगामुळे पाच महिलांना रोजगार मिळाला आहे. शिवाय उमेश, आई अन्नपूर्णा, वडील बाबाराव स्वतः त्यात कष्ट करतात. बंधू सोमनाथ शेतीची जबाबदारी सांभाळून विविध कामांमध्ये मदत करतात.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## दिवाळीच्या तोंडावर वीज कर्मचाऱ्यांचा संप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :**
महावितरण, महानिर्मिती, महापारेषण या तिन्ही शासकीय कंपन्यांतील विविध कामांचे खासगीकरण, महावितरणमधील पुनर्रचना या विरोधात विद्युत क्षेत्रातील कामगार संघटना संतापल्या असून सात संघटनांनी एकत्र येत महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीच्या बॅनरखाली ९ ऑक्टोबरला राज्यव्यापी संपाची नोटीस दिली आहे. त्यामुळे सणासुदीत वीज यंत्रणा विस्कळीत होण्याची भीती आहे.

अदानी, टोरंट, टाटासह इतर काही खासगी कंपन्यांनी महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रातील मोठ्या शहरांमध्ये समांतर वीज वितरण परवान्यासाठी राज्य वीज नियामक आयोगाकडे अर्ज केले आहेत. एका कंपनीने अर्ज केलेल्या शहरात इतर खासगी कंपन्यांनी अर्ज केले नाहीत. त्यामुळे अर्ज करणाऱ्या खासगी कंपन्यांनी समांतर वीज परवान्यासाठी परस्पर शहर वाटून परवाना मिळवण्याचा घाट रचल्याचा आरोप विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने केला आहे. या अर्जावर आयोगाकडून सुनावणीही झाली असून निर्णयाची प्रतीक्षा आहे. या समांतर वीज परवान्याला कृती समितीचा विरोध आहे.

९ ऑक्टोबरला एकदिवसीय संपाची नोटीस मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह तिन्ही कंपन्यांना देण्यात आली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## शिक्षकांसाठी कॅशलेस आरोग्य कवच योजना सुरू होणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :**
राज्यातील शिक्षकांसाठी आनंदाची बातमी आहे. लवकरच धर्मवीर आनंद दिघे कॅशलेस शिक्षक कुटुंब आरोग्य कवच योजना राज्यभरात लागू होणार आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश अबीटकर यांच्या उपस्थितीत आरोग्य विभागाने ही योजना तत्त्वतः मान्यता दिली आहे.

या समितीचे नेतृत्व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे करतील, तर महात्मा ज्योतिबा फुले योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख आरोग्यदूत मंगेश चिवटे, शिक्षक संघटनेचे प्रतिनिधी प्रा. डॉ. बापूसाहेब अडसूळ, प्रा. सुभाष मोरे यांसह उच्चपदस्थ अधिकारी या समितीत सहभागी असणार आहेत.

या योजनेअंतर्गत शिक्षकांना मोफत शस्त्रक्रिया, उपचार व आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहेत, असे आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी सांगितले.

# ताडोबातील सफारी शुल्क महागले

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २४ :**
ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पातील सफारी मध्यमवर्गीयांसाठी आधीच परवडणारी नव्हती. त्यानंतरही अनेक मध्यमवर्गीय पैशांची जुळवाजुळव करून कुटुंबीयांसह येत होते. मात्र, आता त्यांचे हे स्वप्नही धूसर झाले आहे.

व्यवस्थापन कोट्याअंतर्गत सुधारित सफारी शुल्क एक ऑक्टोबरपासून लागू केले जाणार आहेत. त्यामुळे ताडोबाची सफारी आता श्रीमंतांपुरतीच मर्यादित झाल्याचे चित्र आहे. येत्या १ ऑक्टोबरपासून हे नवे शुल्क लागू होणार आहेत.

जागतिक जंगल पर्यटन नकाशावर भारतातील जी व्याघ्रपकल्प आहेत, त्यात ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्प एक आहे. कोअर क्षेत्रच नाही तर बफर क्षेत्रातही अलीकडे सहज व्याघ्रदर्शन होत आहे. किंबहूना कोअरपेक्षा बफरक्षेत्राकडे पर्यटकांचा ओढा वाढला आहे. माया, मटकासूर, सोनम, मधू, छोटा मटका, छोटी मधू या वाघांमुळे पर्यटक या व्याघ्रप्रकल्पाकडे ओढले जातात. १ ऑक्टोबरपासून ताडोबाच्या गाभा क्षेत्रातील पर्यटनाची दारे खुली होत आहेत. मात्र, त्याचवेळी पर्यटकांना नव्या सफारी शुल्कासह या व्याघ्रप्रकल्पात प्रवेश घ्यावा लागणार आहे.



ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर क्षेत्रात पूर्वी सोमवार ते शुक्रवार प्रवेश शुल्क ४ हजार रुपये, मार्गदर्शक शुल्क ६०० रुपये व वाहन शुल्क ३ हजार रुपये असे एकूण ७६०० रुपये शुल्क आहे. शनिवार आणि रविवारी कोअर क्षेत्रात प्रवेश शुल्क ८ हजार रुपये, मार्गदर्शक शुल्क ६०० रुपये, वाहन शुल्क ३ हजार रुपये असे एकूण ११ ६०० रुपये आकारले जाणार आहे.

पूर्वी बफर क्षेत्रात सोमवार ते शुक्रवार प्रवेश शुल्क ३ हजार रुपये, मार्गदर्शक शुल्क सहाशे रुपये व वाहन शुल्क २७०० रुपये असे एकूण ६३०० रुपये आकारले जात होते. शनिवार व रविवारी प्रवेश शुल्क ६ हजार रुपये, मार्गदर्शक शुल्क ६०० रुपये व वाहन शुल्क २७०० रुपये असे एकूण ९३०० रुपये आकारले जात होते.

# सीडीपीओसह लिपीकाला अटक

**एम. ए ची बनावट गुणपत्रिका अंगणवाडी सेविका भरती प्रकरण**

■ **महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २४ :**
अंगणवाडी सेविका पदभरती अर्जासोबत एम. ए. अंतिम वर्षाची बनावट गुणपत्रिका जोडल्याप्रकरणी अर्जदार महिलेसह बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शीला महेंद्र गेडाम तथा लिपिक प्रशांत देवराव खामनकर या दोघांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस स्टेशन नागभीड येथे तक्रारदार बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती शिला महेंद्र गेडाम, नागभीड यांनी १६ सप्टेंबर रोजी तक्रार दिली की, आरोपी सौ. करिश्मा आशिष मेश्राम (२९) रा. पळसगाव खुर्द हीने अंगणवाडी सेविका पदभरतीचे अजासोबत एम.ए. अंतिम वर्षाची बनावट गुणपत्रिका सादर करून ती खरी म्हणुन वापरून शासनाची फसवणुक केली. या प्रकरणी श्रीमती मेश्राम हिचे विरूध्द पो.स्टे. नागभीड येथे विविध कलमान्वये नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी स.पो.नि. किशोरकुमार वैरागडे यांनी नागभीडचे पोलीस निरीक्षक रमाकांत कोकाटे पो.स्ट यांचे मार्गदर्शनात आरोपी सौ. करिश्मा आशिष मेश्राम हिचे सोबत नागभीड येथील बालविकास प्रकल्प अधिकारी शिला महेंद्र गेडाम व लिपिक प्रशांत देवराव खामणकर यांचा या संपूर्ण प्रकरणात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

त्यावरून सदर गुन्हयात कलम ६१(२) भा.न्या.सं. वाढ करून बालविकास प्रकल्प अधिकारी शिला महेंद्र गेडाम, नागभीड व प्रशांत लिपिक देवराव खामणकर, लिपीक, कार्यालय बालविकास प्रकल्प अधिकारी, नागभीड यांना अटक करण्यात आली आहे.

ही कामगिरी मा. पो. अ. मम्मुका सुदर्शन , अपर पो. अ. ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी राकेश जाधव , पोलीस निरीक्षक रमाकांत कोकाटे पो.स्टे. नागभीड यांचे मार्गदर्शनात स.पो.नी. किशोरकुमार वैरागडे, पो.अं. विक्रम आत्राम, पो.अं. गायकवाड यांनी कौशल्यपुर्वक मार्गाने तपासाचे धागेदोरे जोडत फसवणुक करणारी अर्जदार महिला तसेच या प्रकरणात तिला सहकार्य करणारी महिला बाल विकास प्रकल्प अधिकारी आणि लिपीकाला ताब्यात घेतले.